दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिद्ध
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २५२ । गुरूवार २५ जून २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




## महाराष्ट्र व सहजयोग

महाराष्ट्रात सर्व विश्वाची कुंडलिनी नावाची शक्ती आहे. पण ही कुंडलिनी सुप्तावस्थेत आहे एवढच आहे. पण तिचे परिणाम मात्र आपल्या चरित्रावर, आपल्या संस्कृतीवर आहेत. महाराष्ट्रात सुद्धा असे अनेक लोक होऊन गेले ज्यांचे वर्णन करता येत नाही. ज्ञानेश्वर एक असे झाले तरी आपल्याला माहिती आहेत की कितीतरी संत साधू वारंवार म्हणजे तुम्ही दत्तात्रयांच्या वेळेपासून पाहिले तर आदिनाथ सुद्धा – त्यांच्या आधी पासून आदिनाथ–दत्तात्रयांचे जे अवतरण होते सुरूवातीचे आदिनाथांचे, ते सुद्धा या महाराष्ट्रात झाले. इतकच नव्हे तर जे मोठे मोठे संत–साधू झाले त्यांनी नेहमी महाराष्ट्राला भेट दिली. जे बाहेर होते, गुरूनानक होते ते इकडे आले किंवा जे जे असे– वल्लभाचार्य होते फार मोठे ते महाराष्ट्रात येऊन गेले. इतकेच नव्हे तर श्री राम आणि श्री सीता या पुनीत भूमीवर फिरलेले आहेत. त्यांचे चरण या भूमीला लागलेले आहेत. ही भूमी पावन आहे आणि त्या पावन भूमीत तुमचा पावन जन्म झाला आहे. पण आपण पावन आहोत ही कल्पना मात्र फार कमी लोकांना आहे आणि त्यामुळेच सगळे प्रश्न उभे रहातात. तुम्ही पावन आहात म्हणजे तुमच्यात एक फार मोठी शक्ती आहे. ही शक्ती पावित्र्याची शक्ती तुमच्यात आहे. आणि ही जी पावित्र्याची शक्ती आहे ती जास्त वाढवली पाहिजे. ती कमी करू नये.पण आजपर्यंत सगळ्यांनी सांगितले आहे पण सायन्स काही आत्मा शोधून दाखवू शकत नाही कारण सायन्स फार तर फार आपल्या प्राण शक्तीवरच काम करू शकतो. प्राणशक्ती शिवाय आपल्यामध्ये एक मन:शक्ती आहे. ती डावीकडे असते. त्याशिवाय आपल्यामध्ये धर्मशक्ती आहे. म्हणजे सायन्स या गोष्टीचे उत्तर देऊ शकत नाही की अमीबापासून मनुष्य का झाला ? ०१ फेब्रुवारी १९८२,महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी
अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## 'बाटली'ची सक्ती नको...
# हॉटेल, धाब्यावर पिण्यायोग्य पाणी मोफत द्या

### राज्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांचा आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट, धाबे, इटरीज आणि ज्या ठिकाणी अन्न प्रक्रिया केली जाते त्यांनी नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कुणीही वाचवू शकणार नाही असा इशारा राज्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. तसेच हॉटेल्सनी ग्राहकांना पिण्यायोग्य आणि सुरक्षित पाणी हे मोफत देणे गरजेचे आहे, तसा बोर्ड त्यांनी समोर लावावा, अन्यथा कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

राज्यातील नागरिकांना सुरक्षित अन्न मिळावं यासाठी अन्न व औषध प्रशासनाने 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' ही मोहीम राबवली जात आहे. त्यासाठी सर्वांनीच नियमांची अंमलबजावणी करावी, अन्यथा कारवाई करण्यात येईल असं तुकाराम मुंढे म्हणाले.

राज्यातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इतर सर्व ठिकाणी ग्राहकांना पिण्यायोग्य आणि सुरक्षित पाणी हे मोफत उपलब्ध करण्यात यावं, बाटलीबंद पाणी देऊ नये, तसा बोर्ड त्यांनी समोर लावावा. जर एखाद्या ग्राहकाने या व्यतिरिक्त बाटलीबंद पाणी मागितलं तर त्याला ते द्यावं. जर याची (पान ४ वर)

#### किचन कसं असावं?

- –भिंती आणि फ्लोअर हा टाईल्सचा असावा. त्या टाईल्स वॉशेबल असाव्यात.
- –त्यातून पाणी झिरपू नये.
- –हे करताना पुरेशी हवा खेळती हवी.
- –किचनला एक्झॉस्ट असावा.
- –कच्चा मालासाठी वेगळा सेक्शन असावा.
- –स्वयंपाक तयार करण्यासाठी वेगळा सेक्शन
- –कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगळे असावे.
- –शाकाहारी आणि मांसाहारी अन्न वेगवेगळे ठेवावेत.
- –इलेक्ट्रॉनिक फ्लाय ट्रॅप बसवावेत.
- –पेस्ट कंट्रोल नियमित करावं.
- –अन्नाच्या ठिकाणी किडे, झुरळ, पाल, उंदरांचा प्रादुर्भाव नसावा.
- –ग्राहक हॉटेलमध्ये आल्यानंतर त्यांच्यासाठी पाणी, हँडवॉश, साबण, टॉवेल ठेवण्यात यावेत.

#### सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र मोहीम

अन्नात कुठेही भेसळ होऊ नये यासाठी काही पावलं उचलण्यात येतात, त्याची जबाबदारी राज्याच्या एफडीए आयुक्तांवर असते. २३ जून रोजी एक आदेश काढण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इटरिज यांनी नियम पाळणे बंधनकारक असेल. अन्न व सुरक्षा मानके यानुसार त्यांनी रजिस्ट्रेशन करावं. अन्न उत्पादन मानके, २०११ याच्यासह अनेक नियमांची अंमलबजावणी होणं गरजेचं आहे. तसेच शाळेच्या मुलांच्या सुरक्षेसाठी नियमांची अंमलबजावणी होणं आवश्यक आहे.

**– तुकाराम मुंढे**

## स्वप्नातील लग्न ठरले फसवणुकीचे दु:स्वप्न!

### १३ लाखांचा खर्च, ११ तोळे सोने घेऊन ऐनवेळी नकार देणाऱ्या तरुणावर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर :** मुलीच्या लग्नाची स्वप्ने उराशी बाळगून कुटुंबीयांनी साखरपुड्यापासून लग्नाच्या तयारीपर्यंत लाखो रुपये खर्च केले. नातेवाईकांना निमंत्रणे दिली, मंगल कार्यालय ठरले, दागिने खरेदी झाले; मात्र लग्नाच्या काही दिवस आधीच वरपक्षाकडून आणखी पैशांची मागणी होताच हे स्वप्न दु:स्वप्नात बदलले. नगर शहरात घडलेल्या या घटनेमुळे एकाच कुटुंबाला आर्थिक आणि मानसिक धक्का बसला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील बालिकाश्रम रोड परिसरातील एका तरुणीचा विवाह अभिजीत निवृत्ती जावळे (रा. पंढरपूर) याच्याशी ठरला होता. लग्नाच्या बोलणीदरम्यान वरपक्षाने विविध कारणे सांगत मोठ्या प्रमाणात खर्च करवून घेतला. साखरपुड्यासाठी सुमारे पाच लाख रुपये, नवरदेवाच्या कपड्यांसाठी रक्कम तसेच लग्नासाठी कपडे, मंगल कार्यालय, केटरिंग आणि इतर तयारीवर आणखी आठ लाख रुपये खर्च करण्यात आला.

याशिवाय लग्नासाठी १७ लाख रुपये किंमतीचे ११ तोळे सोन्याचे दागिने घेण्यास सांगण्यात आले. धार्मिक विधीचे कारण देत हे दागिने लग्नापूर्वीच स्वत:कडे घेतल्याचा आरोप आहे.

- **लग्न अवघ्या काही दिवसांवर आले असताना फर्निचर, भांडी आणि वरातीच्या खर्चासाठी आणखी पाच लाख रुपयांची मागणी करण्यात आली. मुलीच्या कुटुंबीयांनी असमर्थता दर्शवताच लग्न मोडल्याचा संदेश देण्यात आला. लग्नपत्रिका वाटून झालेल्या असताना ऐनवेळी विवाह मोडल्याने कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला.**

या प्रकरणी मुलीच्या आईच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी अभिजीत जावळे व त्याच्या नातेवाईकांविरुद्ध फसवणूक आणि हुंडाबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. ही घटना हुंड्याच्या लोभापोटी नातेसंबंध आणि विश्वास कसा तुटू शकतो, याचे वेदनादायी उदाहरण ठरत आहे.

## संगमनेरच्या मागणीला यश!
# आता प्रत्येक पोलीस ठाण्यात 'अमली पदार्थविरोधी स्वतंत्र युनिट'

### मुख्यमंत्र्यांची अधिवेशनात घोषणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**संगमनेर :** संगमनेर शहर व ग्रामीण भागात वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या पुरवठा, तस्करी व विक्रीच्या पार्श्वभूमीवर संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी आ. अमोल खताळ यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात वेळोवेळी केली होती.

अमली पदार्थांचा सखोल तपास करण्यासाठी स्थानिक पोलिसांचे विशेष पथक नेमावे, या अवैध धंद्यांना राजाश्रय कोण देत आहे याची चौकशी करावी तसेच दोषींवर विद्यमान कायद्यांतर्गत कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी गृहमंत्र्यांकडे केली होती. या मागणीची दखल घेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसाळी अधिवेशनात महत्त्वपूर्ण घोषणा केली.

राज्यातील अमली पदार्थांची विक्री, तस्करी आणि सेवन रोखण्यासाठी राज्य शासनाकडून व्यापक मोहीम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी विधानसभेत स्पष्ट केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, अमली पदार्थ व्यापार आणि सेवनाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील पोलीस ठाण्यात अमली पदार्थविरोधी कारवाईसाठी स्वतंत्र युनिट उभारण्यात येणार आहे. या युनिटच्या माध्यमातून अमली पदार्थांच्या साखळीचा शोध घेऊन तस्करी, पुरवठा आणि विक्री करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई केली जाईल.(पान ४ वर)

## आईच्या कुशीतच थांबला दोन लेकरांचा श्वास...

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

- **ताथवडे येथे तिघा मायलेकरांची सामूहिक आत्महत्या**
- **आर्थिक विवंचनेतून उचललेले टोकाचे पाऊल**



**पुणे :** जीवनातील संकटे कितीही मोठी असली तरी ती आईच्या मायेपेक्षा मोठी नसतात, असे म्हटले जाते. मात्र ताथवडे येथे घडलेल्या हृदयद्रावक घटनेने हा विश्वासच हादरवून टाकला आहे. एका आईसह तिच्या दोन निष्पाप लेकरांचे मृतदेह घरात आढळल्याने संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे.

कल्पना बिपीन सूर्यवंशी (३५), शुभश्री (१७) आणि दादू (१०) या तिघांचा एकाच वेळी मृत्यू झाल्याची बातमी समोर येताच शेजाऱ्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. काही दिवसांपूर्वीपर्यंत हसत–खेळत दिसणारे हे कुटुंब अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने अनेकांना धक्का बसला आहे. प्राथमिक माहितीनुसार आर्थिक विवंचनेने त्रस्त झालेल्या कल्पना सूर्यवंशी यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचा संशय आहे. मात्र या घटनेत सर्वाधिक वेदनादायक बाब म्हणजे या संघर्षात दोन निरागस जीवही कायमचे हरपले. (पान ४ वर)

## जीएसटी सुधारणा विधेयक स्थगित; बहुमत असूनही सरकारची माघार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**मुंबई :** महाराष्ट्र जीएसटी (वस्तू व सेवा कर) कायद्यात काही तांत्रिक बदल करण्यासाठी आणलेले सुधारणा विधेयक विधान परिषदेत बुधवारी स्थगित ठेवावे लागले. विरोधकांनी जीएसटीच्या दरांबाबत, अंमलबजावणीतील अडचणींबाबत आणि व्यापाऱ्यांवरील वाढत्या करभाराबाबत आक्षेप घेतल्याने सरकारला हे विधेयक पुढे ढकलावे लागले. वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी जीएसटी कायद्यातील काही तांत्रिक दुरुस्तींचे विधेयक सभागृहात मांडले होते. मात्र काँग्रेस, ठाकरे गट आणि अपक्ष सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा करण्याची मागणी केली.

आमदार सत्यजित तांबे यांनी स्थानिक स्वराज्य संस्था आणि शैक्षणिक संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या अनेक सेवांवर १८ टक्क्यांपर्यंत जीएसटी आकारला जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला. अंबादास दानवे आणि सतेज पाटील यांनी राज्य सरकार केंद्राचे कायदे थेट स्वीकारत असल्याची टीका करत जीएसटी परिषदेत महाराष्ट्राची भूमिका ठामपणे मांडण्याची मागणी केली.

विशेष म्हणजे भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांनीही स्वयंपुनर्विकास प्रकल्पांना जीएसटीमधून सवलत देण्याची मागणी केली. विकासकांकडून घर खरेदीदारांकडून चुकीच्या पद्धतीने जीएसटी वसूल होत असल्याचा आरोप त्यांनी केला. (पान ४ वर)

## तुकाराम मुंढेंच्या बदलीसाठी २५० कोटींची 'सुपारी'?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या बदलीसाठी तब्बल २५० कोटी रुपयांची 'सुपारी' देण्यात आल्याचा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत केला.

राज्यभर सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे भेसळखोर आणि औषध माफियांचे अनेक अवैध धंदे बंद पडले आहेत. त्यामुळे मोठी औषध लॉबी आणि संबंधित हितसंबंधी तुकाराम मुंढे यांची बदली करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा दावा आव्हाड यांनी केला. या प्रकरणामागील मोठी नावे लवकरच जाहीर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी सभागृहात स्पष्ट केले की, विभागाची कारवाई प्रभावीपणे सुरू असून तुकाराम मुंढे यांच्या बदलीचा सध्या कोणताही प्रश्न नाही. विभागातील अधिकाऱ्यांसाठी चांगली वाहने आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार अर्जुन खोतकर यांनी तुकाराम मुंढे यांना धमक्या मिळत असल्याचा दावा करत त्यांना सुरक्षा देण्याची मागणी केली. तर मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत त्यांना किमान तीन वर्षे पदावर कायम ठेवावे, अशी भूमिका मांडली.

## महत्त्वाचे..

### येत्या दोन दिवसात मुसळधार पाऊस : पंजाबराव डख

पुणे : महाराष्ट्रात पावसाचा जोर आणखी वाढत जाणार आहे, पुढील काही तासांमध्ये जळगाव जिल्हा, धुळे जिल्हा, नंदुरबार जिल्हा, नाशिक जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, बीड जिल्हा, परभणी जिल्हा, जालना जिल्हा, बुलाढाणा जिल्हा, अकोला जिल्हा, अमरावती जिल्हा, भंडारा, वर्धा, नागपूर जिल्हा, यवतमाळ जिल्हा असा सर्वत्र जोरदा पाऊस होणार आहे. २४ जून, २५ जून, २६ जून हे चार दिवस राज्यात पावसाचा जोर अधिक राहणार आहे, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे. शेतकऱ्यांना काळजी करण्याचं कारण नाही, सगळ्या शेतकऱ्यांचा पेरण्या होणार आहेत. पूर्व विदर्भ, पश्चिम विदर्भ, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र कोकण किनारपट्टी, खानदेश, मराठवाडा, या सर्व भागांमध्ये जोरदार पाऊस होणार आहे. हा पाऊस वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी हजेरी लावणार आहे, मुंबई, पुणे, घाटमाथा, नाशिक, रत्नागिरी ते रायगड या पट्ट्यामध्ये आज जोरदार पावसाची शक्यता आहे.

## लग्नपत्रिकेवर वर–वधूच्या नावापुढे जन्मतारखेची सक्ती?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**


### राजस्थानच्या धर्तीवर महाराष्ट्रात येणार कायदा

**मुंबई :** बालविवाहाबाबत धक्कादायक वास्तव समोर आल्यानंतर सरकार खडबडून जागे झाले. राज्यात लग्नपत्रिकेवरती आता नवरा नवरीच्या नावापुढे जन्मतारीख लिहावी लागणार आहे. राज्य सरकार लवकरच या संदर्भात निर्णय घेण्याच्या तयारीत असून हा नियम लागू केला जाणार आहे. राजस्थान सरकारच्या निर्णयानंतर आता महाराष्ट्र सरकार देखील या निर्णय घेणार असल्याची माहिती आहे. परिणामी या निर्णयामुळे वर वधूचे वय कळू शकणार आहे. त्यामुळे बालविवाहाला आळा बसणार असल्याचा दावा केला जात आहे.

दुसरीकडे, राज्यात बालविवाहाबाबत धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. परभणी जिल्हात ४८% मुलींचे अल्पवयात लग्न झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तसेच राज्यातील अनेक जिल्ह्यांत बालविवाहाचे प्रमाण चिंताजनक असल्याची माहिती विधानसभेत सरकारकडून सादर केलीय. बालविवाह कायद्याने गुन्हा असून देखील समोर आलेली आकडेवारी धक्कादायक आहे. परिणामी कायद्याची अंमलबजावणी काटेकरपणे व्हावी या अनुषंगाने या नव्या निर्णायाची तयारी (पान ४ वर)

#### बालविवाह आघाडीवर चार जिल्हे व अल्पवयीन मुलींची टक्केवारी

- **परभणी ४८%,**
- **बीड ४३.७%,**
- **धुळे ४०.५%**
- **सोलापूर ४०.३%**





## लाखोंचे सीसीटीव्ही वर्षभरातच ठप्प!

### नेवाशात नगरोत्थान योजनेतील कामावर प्रश्नचिन्ह; निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करण्याची मागणी

**करण नवले । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नेवासा शहरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि गुन्हेगारी घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेली सीसीटीव्ही यंत्रणा अवघ्या एका वर्षातच बंद पडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नगरोत्थान योजनेतून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे शहरावर सीसीटीव्हीचे जाळे उभे राहील, अशी अपेक्षा होती. मात्र आज परिस्थिती अशी आहे की लाखो रुपयांचा खर्च करून बसविण्यात आलेले बहुतांश कॅमेरे बंद असून शासनाचा निधी अक्षरश: वाऱ्यावर गेल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

नेवासा नगरपंचायतीतर्फे शहरातील २७ महत्त्वाच्या ठिकाणी तब्बल ७८ सीसीटीव्ही कॅमेरे आणि पाच ठिकाणी पीटीझेड (पॅन–टिल्ट–झूम) कॅमेरे बसविण्यात आले होते. या कामासाठी सुमारे सात हजार मीटर केबल टाकण्यात आली होती. शहरातील हालचालींवर नजर ठेवून गुन्हेगारी घटनांचा तपास सुलभ व्हावा, हा या योजनेमागील उद्देश होता.

या कामाची सुरुवात ६ जुलै २०२२ रोजी करण्यात आली होती, तर ६ फेब्रुवारी २०२३ रोजी काम पूर्ण झाल्याची नोंद आहे. विशेष म्हणजे या कामाच्या करारामध्ये एक वर्षांची देखभाल व दुरुस्तीची अट समाविष्ट करण्यात आली होती. मात्र हमी कालावधी संपताच यंत्रणाच बंद पडल्याने कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शहरातील विविध चौक, रस्ते आणि महत्त्वाच्या ठिकाणी बसविण्यात आलेले अनेक कॅमेरे बंद पडले असून त्यांचा कोणताही उपयोग होत नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. लाखो रुपये खर्चून उभारलेली यंत्रणा आज केवळ शोभेची वस्तू बनल्याची भावना व्यक्त होत आहे. लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी निवडणुकीपूर्वीच याची तक्रार केली होती.

नगरपालिका प्रशासनाने कॅमेरे पुन्हा सुरू करण्यासाठी पाठपुरावा केल्याची माहिती समोर येत असली तरी प्रत्यक्ष दुरुस्तीची जबाबदारी कोण घेणार, हा प्रश्न अद्यापही अनुत्तरित आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. (पान ४ वर)

#### सीसीटीव्ही प्रकल्पाची ठळक माहिती

- **२७ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे**
- **एकूण ७८ सीसीटीव्ही कॅमेरे**
- **५ पीटीझेड कॅमेरे**
- **७ हजार मीटर वायर**
- **कामाची सुरुवात : ६ जुलै २०२२**
- **काम पूर्ण : ६ फेब्रुवारी २०२३**
- **एक वर्ष देखभाल–दुरुस्तीची अट**
- **सध्या बहुतांश कॅमेरे बंद**

#### अधिकारी, ठेकेदार व पत्रकाराचे संगणमत..?

नगरोत्थान योजनेतील नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत हा प्रकल्प राबविण्यात आला होता. यासाठी खर्च करण्यात आलेला निधी हा जनतेच्या कराच्या पैशातून आलेला आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या खर्चातून उभारलेली यंत्रणा अवघ्या एका वर्षातच बंद पडणे ही गंभीर बाब आहे. सीसीटीव्हीच्या टेंडर साठी लाखो रुपये जास्त खर्च झाले. बाहेरच्या ठेकेदाराला तत्कालीन सीईओ आणि एक स्थानिक पत्रकार पार्टनर असल्याचा मला संशय आहे. त्याची चौकशी करण्याची यापूर्वीच आम्ही मागणी केली आहे. पालिकेने कॅमेऱ्यासाठीचे लाईट बिल ही भरले. त्याचा कंट्रोल पोलीस स्टेशनला असल्याने पोलीस प्रशासनाने देखभाल दुरुस्ती करणे गरजेचे आहे. याबाबतची मागणी आम्ही नूतन पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्याकडे केली आहे. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने लवकरच कॅमेरे सुरू होण्याची अपेक्षा आहे.

**– डॉ. करणसिंह घुले, नगराध्यक्ष**

# शब्दांचा घोटाळा आणि पदाची जबाबदारी

महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या संदर्भातील शोकप्रस्तावाचे वाचन करताना झालेल्या चुका आणि त्यानंतर उसळलेले राजकीय वादळ हे केवळ एका व्यक्तीच्या भाषिक चुकांपुरते मर्यादित नाही. ही घटना घटनात्मक पदावरील व्यक्तींची जबाबदारी, भाषेचे महत्त्व आणि सार्वजनिक जीवनातील सतर्कता यावर पुन्हा एकदा प्रकाश टाकणारी ठरली आहे.

विधानसभा किंवा संसद ही केवळ कायदे बनविण्याची ठिकाणे नसतात; ती लोकशाहीच्या प्रतिष्ठेची प्रतीके असतात. त्या सभागृहातील प्रत्येक शब्द, प्रत्येक उच्चार आणि प्रत्येक कृतीचा संदेश संपूर्ण समाजापर्यंत पोहोचत असतो. त्यामुळे अध्यक्ष, सभापती, मुख्यमंत्री, मंत्री किंवा विरोधी पक्षनेते यांच्याकडून होणारी छोटीशी चूकही मोठ्या चर्चेचा विषय बनते.

राहुल नार्वेकर यांच्या वाचनातील चुकांवरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पत्र लिहून नाराजी व्यक्त केली. त्यानंतर शिवसेना (ठाकरे गट) नेते संजय राऊत यांनी आणखी तीव्र प्रतिक्रिया देत अध्यक्षपदावरून हटविण्याची मागणी केली. राजकीय विरोधकांनी या घटनेचा वापर सत्ताधाऱ्यांवर टीका करण्यासाठी केला, हे स्वाभाविक आहे. मात्र या वादातून एक मूलभूत प्रश्न समोर येतो घटनात्मक पदावरील व्यक्तींनी सार्वजनिकरीत्या बोलताना किती तयारी आणि किती जबाबदारी दाखवावी?

भारतीय संसदीय इतिहासात अशा अनेक घटना घडल्या आहेत. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८५ मध्ये ''दिल्लीतून एक रुपया निघाला तर गरीबांपर्यंत फक्त १५ पैसे पोहोचतात'' हे विधान केले होते. त्याचा अर्थ वेगळा असला तरी पुढील अनेक दशकांपर्यंत तो भ्रष्टाचाराचे प्रतीक म्हणून उद्धृत केला गेला. एका वाक्याने संपूर्ण राजकीय चर्चेची दिशा बदलली.

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग अत्यंत अभ्यासू आणि संयमी नेते म्हणून ओळखले जातात. तरीही संसदेतील त्यांच्या काही मौजक्या विधानांवरून विरोधकांनी मोठे राजकारण केले. ''इतिहास माझ्याशी न्याय करेल'' हे त्यांचे वाक्य आजही चर्चिले जाते. कारण सार्वजनिक जीवनात प्रत्येक शब्दाचे वजन असते.




अटल बिहारी वाजपेयी यांचे उदाहरण वेगळे आहे. ते बोलण्याआधी थांबत, शब्द निवडत आणि मगच भाष्य करत. त्यांच्या भाषणांमधील नेमकेपणा आणि भाषेवरील प्रभुत्वामुळे विरोधकही त्यांचे कौतुक करत. घटनात्मक पदावरील व्यक्तीने कसे बोलावे, याचे ते आदर्श उदाहरण मानले जाते.

महाराष्ट्रातही अशा घटना नवीन नाहीत. बाळासाहेब ठाकरे यांच्या भाषणातील एखादे वाक्य अनेक दिवस राजकीय चर्चेचा विषय ठरत असे. शरद पवार यांचे एखादे सूचक विधान किंवा उद्धव ठाकरे यांची एखादी टिप्पणीही अनेक अर्थांनी उलगडली जात असे. कारण मोठ्या पदावरील व्यक्तींचे शब्द हे केवळ शब्द राहत नाहीत; ते संदेश, संकेत आणि भूमिका बनतात.

याच पार्श्वभूमीवर राहुल नार्वेकर प्रकरणाकडे पाहिले पाहिजे. चूक ही कोणाकडूनही होऊ शकते. प्रश्न चूक होण्याचा नाही; प्रश्न त्या पदाच्या अपेक्षांचा आहे. विधानसभा अध्यक्ष हे पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन सभागृहाचे संरक्षक मानले जातात. त्यांच्याकडून भाषिक, प्रक्रियात्मक आणि घटनात्मक अचूकतेची अपेक्षा असते. त्यामुळे अशा पदावर असलेल्या व्यक्तीने प्रत्येक दस्तऐवज, प्रस्ताव किंवा निवेदन याची पूर्वतयारी करणे आवश्यक ठरते.

या घटनेतून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते. महाराष्ट्रात मराठी भाषेबाबतची संवेदनशीलता आजही अत्यंत तीव्र आहे. मराठी ही केवळ संवादाची भाषा नाही; ती अस्मिता, इतिहास आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. त्यामुळे मराठीशी संबंधित कोणतीही चूक सामान्य प्रशासनिक त्रुटी म्हणून पाहिली जात नाही. तिचा भावनिक आणि राजकीय अर्थ लावला जातो.

मात्र या वादात संतुलनही आवश्यक आहे. एखाद्या चुकीवर टीका होणे योग्य असले, तरी वैयक्तिक पातळीवर जाणारी भाषा लोकशाहीच्या दर्जाला शोभणारी नाही. सभागृहाची प्रतिष्ठा टिकवण्याची जबाबदारी सत्ताधारी आणि विरोधक दोघांचीही असते. चुका दाखवून देणे हे विरोधकांचे कर्तव्य आहे; पण त्याचवेळी घटनात्मक संस्थांबद्दलचा आदर कायम ठेवणेही तितकेच आवश्यक आहे.

लोकशाहीत शब्द हेच सर्वात प्रभावी शस्त्र असतात. त्यामुळे ज्यांच्या हातात राज्यकारभार, कायदे आणि लोकांचे प्रतिनिधित्व आहे, त्यांनी शब्दांचा वापर अधिक जबाबदारीने करणे गरजेचे आहे. राहुल नार्वेकर यांच्या घटनेतून मिळणारा खरा धडा हाच आहे की, घटनात्मक पदावरील व्यक्तीची प्रत्येक कृती आणि प्रत्येक शब्द हा सार्वजनिक विश्वासाशी जोडलेला असतो. राजकारणातील अनेक वाद काळाच्या ओघात विस्मरणात जातात. मात्र सार्वजनिक जीवनात शब्दांची किंमत आणि पदाची प्रतिष्ठा यांची आठवण करून देणाऱ्या घटना कायम स्मरणात राहतात. त्यामुळे ही घटना केवळ एका व्यक्तीच्या चुकीची नसून, लोकशाहीतील जबाबदार नेतृत्वाला दिलेला एक महत्त्वाचा संदेश आहे.

# पिठाच्या गोळ्यांमुळे गावरान कोंबड्यांचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव :** राहुरी तालुक्यातील दरडगाव थडी येथे संशयास्पद पिठाचे गोळे खाल्ल्याने गावरान कोंबड्यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

मिळालेल्यामाहितीनुसार, येथील बाळासाहेब विठ्ठल जाधव यांच्या घरासमोरील जागेत तसेच झाडाखालील कुंडीजवळ अज्ञात व्यक्तीने पिठाचे गोळे टाकल्याचे आढळून आले. परिसरातील गावरान कोंबड्यांनी हे गोळे खाल्ल्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे या गोळ्यांमध्ये काही विषारी अथवा घातक पदार्थ मिसळण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.



ग्रामस्थांच्या मते, मुक्या प्राण्यांच्या जीवाशी खे करणारे असे कृत्य अत्यंत निंदनीय असून समाजासाठी धोकादायक आहे. हे गोळे इतर पक्षी किंवा प्राण्यांनी खाल्ले असते तर आणखी मोठी हानी होण्याची शक्यता होती, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे.

या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी संबंधित यंत्रणांनी नमुने तपासणीसाठी पाठवून सखोल चौकशी करावी, तसेच दोषी व्यक्तीचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, या घटनेची परिसरात जोरदार चर्चा सुरू असून प्रशासनाच्या भूमिकेकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# चांदा येथे एकल महिला दिवस साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने विधवा महिलांसाठी विविध योजना राबविण्याचे धोरण शासनाचे असून त्या अनुषंगाने चांदा येथील ग्रामपंचायत कार्यालयात एकल महिला दिवस साजरा करण्यात आला. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून विधवा महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहिती शासनामार्फत यावेळेस उपस्थित महिलांना देण्यात आली.



एकल महिलांच्या रोजगार स्वयंरोजगार व उपजीविकांच्या संधी बाबत चर्चा करणे बचत गटात नसलेल्या महिलांना बचत गटामध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे व बचत गटांच्या माध्यमातून रोजगार निर्मितीबाबत त्यांना या वेळेस मार्गदर्शन करण्यात आले. माजी सरपंच सुनंदाताई दहातोंडे, अंगणवाडी पर्यवेक्षिका संगीता दळे, सी आर पी अयोध्या निंबाळकर यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. बचत गट अध्यक्षा लताबाई आठरे, अंगणवाडी सेविका मीराताई दहातोंडे तसेच चांदा व परिसरातील अंगणवाडी सेविका एकल महिला उपस्थित होत्या .

# सीईटीमध्ये यश पवारला ९६ टक्के गुण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर -** तालुक्यातील वडाळामहादेव येथील विद्यार्थी यश सागर पवार याने एमएच-सीईटी २०२६ परीक्षेत ९६ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या बळावर यशने ही यशस्वी कामगिरी नोंदविली आहे. स्पर्धात्मक परीक्षेत मिळालेल्या या यशामुळे त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस नवे दालन खुले झाले आहे. यशच्या या यशामागे राजेश व मेघा चुडीवाल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी दिलेल्या योग्य दिशा, अभ्यासाचे नियोजन आणि वेळोवेळी केलेल्या प्रोत्साहनामुळे त्याला हे यश प्राप्त करता आले.

यश हा वडाळामहादेव येथील प्रगतशील शेतकरी चंद्रकांत विश्वनाथ पवार यांचा नातू तसेच सागर व अश्विनी पवार यांचा मुलगा आहे. त्याच्या या यशाबद्दल शिक्षक, नातेवाईक व मित्रपरिवारातून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# वरिष्ठ पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांची पोलीस उपअधीक्षकपदी पदोन्नती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा पोलीस स्टेशनमध्ये पोलीस निरीक्षक पदावर उत्कृष्ट कामगिरी बजावणारे व गिरिम,ता. दौंड जि. पुणे येथील मुळ रहिवासी असलेले व सध्या अहिल्यानगर येथे कार्यरत असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांना राज्य सरकारने पोलीस उपअधीक्षक पदी पदोन्नती दिली आहे.

राज्य सरकारने राज्यातील २२४ पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षक ते पोलीस उपअधीक्षक पदी पदोन्नती दिली आहे. सेवा कालावधी व सेवा अभिलेख पडताळणी आणी छाननी करून पोलीस महासंचालक कार्यालयाने राज्य शासनाकडे अहवाल पाठवला होता. कर्मठ शिस्तीचे म्हणुन परिचित असलेले वरीष्ठ पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांचा देखील या आदेशात समावेश आहे. राज्य शासनाने पदोन्नतीने त्यांची धानोरा, जि.गडचिरोली या नव्या ठिकाणी नेमणूक केली आहे.



धनंजय जाधव हे सन १९९३ साली सरळ सेवा भरतीने पोलीस उपनिरीक्षक म्हणून पोलीस खात्यामध्ये आले होते. त्यांची एकूण ३२ वर्ष सेवा झाली असुन त्यांना सेवा कालावधीत उत्कृष्ट कामगिरी करिता जवळपास त्यांनी दोनशे पेक्षा जास्त बक्षिसे मिळाली आहेत. जाधव यांना शासनाने ऑगस्ट २०२३ देखील पदोन्नती देऊ केली होती परंतु वैयक्तिक कारणास्तव त्यांनी ती नाकारली होती.

धनंजय जाधव यांनी १९९४ साली प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर चंद्रपूर, गडचिरोली, पुणे शहर, सोलापूर ग्रामीण, कोल्हापूर व अहिल्यानगर या ठिकाणी सक्षमपणे कर्तव्य पार पाडले आहे. धनंजय जाधव ऑगस्ट २०२९ अखेर सेवा निवृत्त होणार असून त्यांना ही पदोन्नती मिळाल्यामुळे त्यांचे विशेष कौतुक केले जात आहेत.

## मा. आ. नरेंद्र घुले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भेंडा खुर्द येथे भव्य कबड्डी स्पर्धा उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भेंडा :** माजी आमदार नरेंद्र घुले यांच्या वाढदिवसानिमित्त रणवीर स्पोर्ट्स क्लब व भेंडा खुर्द ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य कबड्डी स्पर्धांना खेळाडू व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेचे उद्घाटन क्षितिज घुले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भेंडा गावचे भूमिपुत्र व बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, मावळ येथील प्रांताधिकारी सुरेंद्र नवले, नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाळासाहेब नवले, लोकनियुक्त सरपंच वर्षा वैभवराव नवले, राष्ट्र सह्याद्रीचे संपादक करण नवले, उपसरपंच सागर महापूर, मार्केट कमिटी सदस्य शिवाजीराव शिंदे, कारखाना संचालक दत्तात्रय काळे, अशोकराव मिसाळ, प्रगतशील शेतकरी सोपनराव नवले, भगवान भागवत, माजी सरपंच सोपनराव महापूर, विष्णू भागवत, परसराम नाकाडे, वामन मापरे, डॉ. भागवत, भाऊसाहेब गदाई, हिरालाल धनवडे, सुरेश धनवडे, संतोष महापूर, हरी नवले, रवींद्र नवले, संदीप खरात, नितीन खरात, विलास खरात, सुनील खरात, भाऊसाहेब शिंदे, चंदू महापूर, लाला बोरुडे यांच्यासह भेंडा खुर्द परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेत विविध भागांतील संघांनी सहभाग नोंदवत चुरशीचे सामने खेळले. अंतिम फेरीपर्यंत प्रेक्षकांनी मैदानावर मोठी गर्दी केली होती. विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके व सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रो कबड्डीपटू शंकर गदाई, राहुल धनवडे, बाळू नाकाडे व सतीश मोहरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देणाऱ्या या स्पर्धेमुळे परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे अभिनंदन करत अशा उपक्रमांमुळे ग्रामीण क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असल्याचे सांगितले.



# दिव्यांगांना मिळणार कृत्रिम अवयव व साहित्य

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी, :** कोपरगाव मतदारसंघातील दिव्यांग बंधू-भगिनींना स्वावलंबी जीवन जगता यावे या उद्देशाने श्री भगवान महावीर विकलांग सहायता समिति, मुंबई, एनएसई फाउंडेशन आणि आ. आशुतोष काळे यांच्या सहकार्यातून दोन दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार (दि. २५) रोजी सकाळी ९ वाजता दिव्यांगांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी करण्यात येणार असून, शुक्रवार (दि. २६) रोजी कोपरगाव येथील महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टच्या सभागृहात कृत्रिम अवयव व आवश्यक साहित्याचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. या शिबिरात अत्याधुनिक कृत्रिम अवयव, पोलिओग्रस्तांसाठी कॅलिपर्स, व्हीलचेअर, थ्री-व्हीलर सायकली, कुबड्या, वॉकर तसेच श्रवणदोष असलेल्या व्यक्तींसाठी आधुनिक श्रवणयंत्रांचे वितरण केले जाणार आहे. शिबिराचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, शासकीय दिव्यांग प्रमाणपत्र, यूडीआयडी कार्ड आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो सोबत आणणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.



# डॉ. निलेश ठुबे यांना आयआयटी गांधीनगरकडून पीएचडी पदवी प्रदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर येथील डॉ. निलेश विलास ठुबे यांना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी गांधीनगर तर्फे पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. आयआयटी गांधीनगरचे संचालक रजत मोना यांच्या हस्ते त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ. ठुबे यांनी ''ड्रिंकिंग वॉटर एक्सेसिबिलिटी अँड चॅलेंज इन रुलर अहमदनगर या विषयावर संशोधन करून पीएचडी पूर्ण केली. या संशोधनासाठी त्यांना प्रा. दिपक सिंघानिया यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राध्यापक पांडे, प्राध्यापक अंबिका आयदुर्ई आणि प्राध्यापक विक्रांत जैन यांनीही वेळोवेळी मार्गदर्शन केले. संशोधन कार्यात विशेष सहकार्याबद्दल त्यांनी स्वर्गीय प्राध्यापक मालविका सुब्रह्मण्यम यांचे आभार मानले.




पीएचडीपूर्वी त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी गांधीनगर येथे संशोधक म्हणून काम केले आहे. तसेच त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बॉम्बे मधून एम.फिल. (प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट) पदवी प्राप्त केली आहे.

या यशामागे स्वर्गीय आई-वडील शशिकला ठुबे व विलास ठुबे यांचे आशीर्वाद तसेच मामा प्रवीण उबाळे, मोठे बंधू सुरेश ठुबे आणि संपूर्ण ठुबे परिवाराचे मोलाचे सहकार्य लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मित्रपरिवार व विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अधिवेशनातील पहिल्याच भाषणात आ. विवेक कोल्हे यांची शेतकरीहिताची मांडणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आ. विवेक कोल्हे यांनी पहिल्याच भाषणात शेतकरी, सहकार, सिंचन आणि कृषी विकासाशी संबंधित विविध विषयांवर सखोल व अभ्यासपूर्ण भूमिका मांडत सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. शेतकरी कर्जमाफी, जलयुक्त शिवार, सिंचन प्रकल्प, पीक विमा, हमीभाव, साठवण सुविधा आणि बाजारपेठ उपलब्धतेसंदर्भात बोलताना त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचे स्वागत केले. म. फुले कर्जमुक्ती योजनेतील त्रुटी दूर करून अधिकाधिक शेतकऱ्यांना नव्या कर्जमाफी योजनेचा लाभ मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अहिल्यानगर, नाशिक व मराठवाड्यासाठी महत्त्वाच्या पश्चिमेचे पाणी पूर्वेकडे वळविणाऱ्या प्रकल्पाला गती देण्याची मागणी करत त्यांनी सिंचन क्षमतेत वाढ करण्यावर भर दिला. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पिकनुकसान, विमा दावे व उत्पादनवाढ यासाठी प्रभावी उपाययोजना राबविता येतील, असेही त्यांनी सांगितले. वीजबिल माफी, पीएम किसान योजना, समृद्धी महामार्ग, सहकार क्षेत्रातील सुधारणा आणि शेतमाल निर्यातीसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचाही त्यांनी उल्लेख केला. कर्जमाफीबरोबरच प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ, साठवणूक व मूल्यवर्धन यांवर भर देऊन शेतकरी स्वावलंबी करण्यासाठी अधिक प्रभावी धोरणे राबविण्याची गरज असल्याचे कोल्हे यांनी अधोरेखित केले.अधिवेशनातील त्यांच्या पहिल्याच भाषणाने शेतकरी प्रश्नांची जाण आणि अभ्यासपूर्ण मांडणीमुळे सभागृहात विशेष छाप पाडली.

# हरेगावात घाणीचे साम्राज्य; पावसाळ्यात नागरिकांच्या आरोग्याला धोका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** पावसाळ्याला सुरुवात होताच हरेगाव परिसरात कचऱ्याचे ढीग आणि दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. रस्त्याच्या कडेला साचलेल्या घाणीमुळे साथीच्या रोगांचा धोका वाढला असून प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी हरेगाव जनहित विकास समितीचे अध्यक्ष सुनिल शिनगारे यांनी केली आहे.

हरेगावच्या मुख्य रस्त्यालगत आणि डंपिंग यार्ड परिसरात प्लास्टिक, कपडे, बाटल्या, चपला यासह मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे. पावसाच्या पाण्यामुळे कचरा कुजून परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. फोटोमध्ये दिसत आहे की, कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर डुकरांचा वावरही वाढला आहे, ज्यामुळे आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.



या संदर्भात सुनिल शिनगारे यांनी प्रशासक व ग्रामसेवक यांना निवेदन दिले आहे. ते म्हणाले, ''पावसाळ्यात साचलेला कचरा लहान मुले, वृद्ध आणि सर्व नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक आहे. ग्रामपंचायतने तातडीने संपूर्ण परिसराची स्वच्छता करावी. कचरा व्यवस्थापनासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.''

घनकचरा व्यवस्थापन माध्यमातून हरेगाव बाजारतळ, हरेगाव गवठाण, हरेगाव डी कॉटर, परिसरात २ प्लांट तयार केले असून शासनाने लाखो रुपये खर्च केले आहेत. मात्र अजूनही घन कचरा व्यवस्थापन हरेगाव ग्रामपंचायत यांनी केले नाही. ग्रामस्थांनीही प्रशासनाच्या उदासीनतेवर नाराजी व्यक्त करत लवकरात लवकर स्वच्छता करण्याची मागणी केली आहे.

## ग्रामीण भागातील पत्र्याच्या सभामंडपांना मान्यता द्या : आ. लंघे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** ग्रामीण भागातील सामाजिक, धार्मिक व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी आवश्यक असलेल्या पत्र्याच्या सभामंडपांना शासनाने मान्यता द्यावी, अशी मागणी आमदार विठ्ठलराव लंघे यांनी विधानसभेत केली. स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सध्या केवळ आरसीसी सभामंडपांनाच प्राधान्य दिले जात असल्याने अनेक गावांना उपलब्ध निधीत दर्जेदार सभामंडप उभारणे शक्य होत नसल्याचा मुद्दा त्यांनी सभागृहात उपस्थित केला.

विधानसभेत बोलताना आ. लंघे म्हणाले की, शासनाचा टिकाऊ आणि सुरक्षित बांधकामाचा हेतू योग्य असला तरी ग्रामीण भागातील परिस्थिती वेगळी आहे. बांधकाम साहित्य, मजुरी व वाहतूक खर्चात झालेल्या वाढीमुळे मंजूर निधीत आरसीसी सभामंडप उभारणे अनेक ग्रामपंचायतींसाठी आर्थिकदृष्ट्या कठीण ठरत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी कामे अपूर्ण राहतात किंवा लहान स्वरूपात करावी लागतात.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने मजबूत स्टील फ्रेम, गॅल्वनाइज्ड पत्रे व सुरक्षित डिझाइनचा वापर करून टिकाऊ व दर्जेदार पत्र्याचे सभामंडप उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

मंदिर परिसर, समाजमंदिरे, स्मशानभूमी, महिला बचत गटांच्या बैठका, शेतकरी सभा व विविध सामाजिक कार्यक्रमांसाठी सभामंडपांची मोठी गरज असल्याचे नमूद करत तांत्रिक निकषांचे पालन करून पत्र्याच्या सभामंडपांना परवानगी दिल्यास अधिक गावांपर्यंत विकासकामांचा लाभ पोहोचेल, असा विश्वास आ. लंघे यांनी व्यक्त केला.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# मुळा कारखान्याची निवडणूक सभासद शेतकऱ्यांनी हातात घेतली : यशवंतराव गडाख

## शेतकऱ्याचा ऊस गाळपाविना राहणार नाही : शंकरराव गडाख

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : मुळा सहकारी साखर कारखान्याची निवडणूक आता सभासद आणि शेतकऱ्यांनी स्वतःच्या हातात घेतली असून, सहकाराच्या बळावर कारखान्याची प्रगती अधिक वेगाने सुरू राहील, असा विश्वास माजी खासदार यशवंतराव गडाख यांनी व्यक्त केला. मुळा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सहकार पॅनलच्या प्रचार सभेत ते बोलत होते. भर पावसात झालेल्या या सभेला सभासद, शेतकरी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती लाभली.



माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या नेतृत्वाखालील सहकार पॅनलचे १८ संचालक बिनविरोध निवडून आले असून, करजगाव गट व महिला मतदारसंघातील निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ या सभेत करण्यात आला. यावेळी बोलताना शंकरराव गडाख यांनी कारखान्याची गाळप क्षमता ९ हजार टनांपर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती दिली. इथेनॉल आणि सहवीज प्रकल्पांमुळे कारखान्याच्या उत्पन्नात वाढ झाली असून त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगला दर देणे शक्य झाले आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्षेत्रात कितीही ऊस उपलब्ध झाला तरी कोणत्याही शेतकऱ्याचा ऊस १२ महिन्यांपेक्षा जास्त काळ गाळपाविना राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कारखान्याचा कारभार पारदर्शकपणे चालविला असून सभासद व ऊस उत्पादकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. काहीजण राजकीय हेतूने खोटे आरोप करत असले तरी त्यांना सभासदच मतदानातून योग्य उत्तर देतील, असेही गडाख म्हणाले. भर पावसात उपस्थित राहिलेल्या शेतकरी व सभासदांचे त्यांनी विशेष आभार मानले. अध्यक्षीय भाषणात यशवंतराव गडाख यांनी मुळा कारखान्याच्या स्थापनेचा इतिहास उलगडला. पन्नास वर्षांपूर्वी शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी मोठ्या कष्टाने मुळा कारखान्याची उभारणी करण्यात आली.

सभासदांच्या विश्वासामुळेच हा कारखाना उभा राहिला आणि नेवासा तालुक्याच्या अर्थकारणाला चालना मिळाली, असे ते म्हणाले. शंकरराव गडाख यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याची क्षमता वाढवून विविध पूरक प्रकल्प उभारण्यात आल्याने शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळप होऊन त्यांना हक्काचे पैसे मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. जुनी व नवी पिढी एकत्र घेऊन कारखान्याचा कारभार सक्षमपणे चालविला जात असल्याचा अभिमानही त्यांनी व्यक्त केला. यावेळी मुळा कारखान्याचे चेअरमन नानासाहेब तुवर, व्हाईस चेअरमन कडूबाळ कर्डिले, ह.भ.प. रामनाथ महाराज पवार, डॉ. रमेश प्रल्हाद जाधव, रत्नाकर बोर्डे, अश्रूबा सानप आदींनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रामनाथ बडे यांनी केले.

शिरेगाव सोसायटीचे चेअरमन डॉ. रमेश जाधव यांनी सहकार पॅनलच्या सर्व उमेदवारांना विक्रमी मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद देत आगामी निवडणुकीत सहकार पॅनलला मोठे मताधिक्य मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

---

## द•ख•ल

### श्रीरामपूरात घरफोडी, मंदिरात चोरी तिघे चोरटे कॅमेऱ्यात कैद

**श्रीरामपूर** : शहरातील वॉर्ड नं.७, रामचंद्रनगर परिसरात घरफोडी तसेच, जवळ असणाऱ्या मंदिरातून देवीचे दागिने चोरून नेण्याची घटना घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील वॉर्ड (नं. ७) मधील रामचंद्रनगर येथे राहणाऱ्या सिमा नरेश सांगळे, (धंदा-किराणा दुकान), यांचे घर फोडून चोरट्यांनी ३० हजारांचा ऐवज चोरून नेला आहेत. सिमा सांगळे या वॉर्ड नं. १, कचेरीमागे राहतात. त्यांनी रामचंद्रनगर, वॉर्ड नं.७ येथे नवीन घर घेतलेले आहे. रात्री सदरचे घर लावून त्या जात असतात. सकाळच्या वेळेस नेहमीप्रमाणे घरी आल्यावर घरात चोरी झाल्याचे दिसून आले. तेव्हा त्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता ३ अनोळखी इसम कॅमेऱ्यात चोरी करताना आढळून आले आहेत. तसेच, शेजारीच असणाऱ्या प्रशांत गोरख लाड यांच्या तुळजाभवानी मंदिरातील देवीचे पिवळ्या धातूचे दागिने चोरट्यांनी चोरून नेले आहेत. मंदिरात चोरी करणारा एक इसम असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

### खेत बचाओ अभियानांतर्गत डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपिके संशोधन प्रकल्पाच्या वतीने 'खेत बचाओ अभियान' व संतुलित खत वापर जनजागृती अभियानांतर्गत कानडगाव, तांभेरे आणि चिंचविहिरे येथे डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर भेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले. महाविद्यालयाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या नेतृत्वाखाली तसेच संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके आणि उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात आले. यावेळी आयोजित तांत्रिक चर्चासत्रात उद्यानविद्यावेत्ता डॉ. सुभाष गायकवाड यांनी डाळिंब पिकासाठी योग्य जमिनीची निवड, मृदा आरोग्य व संतुलित खत व्यवस्थापनाबाबत माहिती दिली. रोगशास्त्रज्ञ डॉ. प्रकाश मोरे यांनी तेलकट डाग व मर रोगाच्या एकात्मिक व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. तर कीटकशास्त्रज्ञ डॉ. अजय हजारे यांनी डाळिंबावरील प्रमुख किडींचे नियंत्रण व प्रतिबंधात्मक उपाय सांगितले. प्रक्षेत्र भेटीदरम्यान गोरख गागरे, सुनील घोरपडे, अनिल घोरपडे, सोमनाथ गागरे, सतीश गागरे, वासुदेव लोंढे, रावसाहेब लोंढे, बाबासाहेब लोंढे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. अभियानाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी सहाय्यक दत्तात्रय गायकवाड यांनी सहकार्य केले.

### नगरपालिकेच्या करवाढीस नागरिकांनी हरकत घ्यावी : खोरे

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर नगरपरिषदेने करदात्या नागरिकांना वाढीव दराने प्रस्तावित घरपट्टी, गाळापट्टी आकारण्यात येत असून त्याबाबतच्या नोटीस नागरीकांना देण्यात येत आहे. मात्र याबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी असून नागरीकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. नगरपरिषदेकडून आकारण्यात येणारी प्रस्तावित वाढीव घरपट्टी, गाळापट्टीला जास्तीत जास्त नागरिकांनी हरकत घ्यावी असे आवाहन नगरसेविका सौ.स्नेहल केतन खोरे यांनी केले आहे. याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नगरसेविका स्नेहल खोरे यांनी म्हटले आहे की, नगरपालिका प्रशासनाने नेमलेल्या एजन्सीकडून मालमत्तांचे चुकीचे वर्गीकरण, कर निर्धारणातील त्रुटी, आकारणीतील विसंगती तसेच नागरिकांना पुरेशी माहिती न देता करण्यात आलेली करवाढ याबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत. ठप्प झालेली बाजारपेठ, वाढलेली महागाई, आवाक्याबाहेर चाललेला जीवनावश्यक खर्च अशा आर्थिक अडचणींचा सामना करीत असलेल्या श्रीरामपूरकरांना वाढीव घरपट्टी लादल्यास त्यांच्या आर्थिक अडचणी अधिकच वाढणार आहेत. जनतेमध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेला रोष पाहता ही करवाढ नागरीक सहन करू शकत नाही. त्यामुळे करवाढीचा पुनर्विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत मोरया फाउंडेशनचे अध्यक्ष केतन खोरे यांनी सांगितले की, नागरिकांना वाढीव करास हरकत घेताना मदत व्हावी म्हणून मोरया फाउंडेशनच्या माध्यमातून नगरपालिके शेजारील हरिकमल प्लाझा येथे मदत केंद्र सुरू केले आहे. एकूण परिस्थितीचा विचार करून वाढीव घरपट्टी पूर्णपणे रद्द करून पूर्वीच्या कर आकारणी पद्धतीनुसारच मालमत्ता कर आकारण्याबाबत श्रीरामपूरच्या सर्वपक्षीय नेत्यांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही केतन खोरे यांनी सांगितले.

### अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई ३.६० लाखांचा मुद्देमाल जप्त

**श्रीरामपूर** : तालुक्यातील हरेगाव येथे वाळूची अवैध वाहतुक करणाऱ्यांविरूध्द एलसीबीने मोठी कारवाई करून आरोपीकडून ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. जिल्हा पोलीस प्रमुख मुम्मका एम सुदर्शन यांच्या आदेशावरून एलसीबीचे पो.नि.संतोष मुटकुळे यांनी पोलीस पथक तयार करत अवैध वाळू उपसा व वाहतुक करणारे इसमांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पथक रवाना केले.मंगळवारी (दि.२३) जून पहाटे पथक पेट्रोलिंग करू अवैध धंद्याची माहिती काढत असतांना पथकास गुप्त बातमीदारामार्फत हरेगाव गावचे शिवारात हरेगाव ते ब्राम्हणगाव वेताळ जाणार्या रस्त्यावर एक निळसर रंगाचा टाटा कंपनीचा पिकअपमध्ये अवैधरित्या चोरुन वाळू भरून वाहतूक करत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने नमुद ठिकाणी जावून सापळा लावून थांबले असता, तेव्हा एक टाटा कंपनीचा पिकअप येतांना दिसली.तेव्हा पथकाने सदर पिकअप थांबवून चालकास ताब्यात घेवून वसीम पाशु शेख, (वय-२६, रा.वळदगाव ता.श्रीरामपूर) असे नाव असल्याचे सांगितले. यात, कारवाईमध्ये १० हजार रूपयांची २ ब्रास वाळूसह ३ लाख ५० हजार रूपयांचा एक टाटा कंपनीचा पिकअप असा, एकूण ३ लाख ६० हजार किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपीविरूद्ध श्रीरामपूर तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

---

## ग्रामीण भागातील सायंकाळच्या लोडशेडिंगविरोधात विधानसभेत आ. खताळ आक्रमक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत होत असलेल्या वीजखंडितीच्या प्रश्नावर आमदार अमोल खताळ यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात जोरदार आवाज उठविला. शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांना या लोडशेडिंगचा मोठा फटका बसत असल्याने सायंकाळच्या वेळेतील वीजखंडिती तात्काळ बंद करण्याची मागणी त्यांनी सभागृहात केली.

राज्यात कुठेही लोडशेडिंग होत नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले असले, तरी संगमनेरच्या ग्रामीण भागातील परिस्थिती वेगळी असल्याचे खताळ यांनी निदर्शनास आणून दिले. महावितरणकडून वीज व्यवस्थापनाच्या नावाखाली सायंकाळी तसेच रात्री वारंवार वीजपुरवठा खंडित केला जात असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.



सायंकाळची वेळ विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची, शेतकऱ्यांच्या कामांची व व्यापाऱ्यांच्या व्यवसायाची असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वारंवार होणाऱ्या वीजखंडितीमुळे घरगुती कामकाज, लघुउद्योग आणि कृषी क्षेत्रावरही प्रतिकूल परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील नागरिकांना अखंड व सुरळीत वीजपुरवठा मिळावा यासाठी संबंधित यंत्रणेला स्पष्ट सूचना देऊन ही वीजखंडिती तातडीने बंद करावी, अशी ठाम मागणी आमदार खताळ यांनी केली.

---

## बेलापूर रेल्वे स्टेशनवर दारू व गांजा पिणाऱ्यांचा अड्डा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : बेलापूर (श्रीरामपूर) रेल्वे स्टेशनवर अनेक अवैध धंदे सुरू आहेत, त्यात मोठ्या प्रमाणावर दारू, गांजा पिणाऱ्या लोकांची मोठी गर्दी असते, एखादा प्रवासी रेल्वे स्टेशनच्या बाहेर उभा असला तरी पोलीस त्याला कॅमेरेचा धाक दाखवून त्रास देतात. मात्र गेल्या अनेक महिन्यापासून या परिसरात सुरू असलेला दारू, गांजा पिणाऱ्यांचा अड्ड्याकडे रेल्वे पोलीस दुर्लक्ष का करतात, याची विचारणा केली असता हे तर आम्हाला खबर देतात, कोणी चोरी केली याची माहिती देतात पण प्रत्यक्षात आजपर्यंत रेल्वे स्टेशन परिसरात झालेल्या मोबाईल चोरी, पाकीट चोरी, सामानांची चोरी, महिलांची छेडछाड आदि संदर्भात एकही माहिती समोर आली नाही, त्यामुळे बेलापूर (श्रीरामपूर) येथील रेल्वे पोलिसांबद्दल आता संशय व्यक्त केला जात आहे. प्रत्यक्ष पाहणी केली असता, रेल्वे स्टेशनच्या बाहेर एकही सीसीटीव्ही कॅमेरा दिसत नाही, रेल्वे स्टेशनचे विस्तरीकणाचे काम सुरू आहे, रात्रीच्या वेळेस अनेक भिक्षा मागणारे लोक या ठिकाणी मुक्कामाला असतात, दानशूर लोक जेवण देतात, पूर्वी या ठिकाणी मोटरसायकल स्टॅन्ड होते, रात्रीच्या वेळी हे ठिकाण गुन्हेगाराचा अड्डा बनला होता. अंधार पडल्यानंतर या परिसरात गुन्हेगारांसह गांजा व दारू पिणाऱ्या लोकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते, अनेक वेळा याच गर्दीतून रेल्वे पोलीस वाट काढत बाहेर पडतात परंतु नशा करणाऱ्या एकाही व्यक्तीची पोलिसांनी कधी विचारपूस केली नाही, रेल्वे स्टेशन वरील मालधक्का येथून अनेक वेळा चोऱ्या झालेले आहेत, रेल्वेचे भंगार चोरीला गेलेले आहेत परंतु आशा चोरीबद्दल रेल्वे पोलिसांनी कारवाई केली नाही, यातून रेल्वे पोलीस व गुन्हेगार यांचे आर्थिक संबंध उघड असल्याचे बोलले जाते, बेलापूर रेल्वे स्टेशन हे दौंड मनमाड मार्गावरील महत्त्वाचे रेल्वे स्टेशन आहे, त्यासाठी कार्यक्षम पोलिसांची गरज आहे, वरिष्ठांनी दखल घ्यावी, गुन्हेगारांशी संबंध असलेल्या पोलिसावर कारवाई करावी, अशी मागणी रेल्वे प्रवाशांनी केली आहे.

---

## एकल महिला दिनानिमित्त महात्मा फुलेंचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा स्तुत्य उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : आंतरराष्ट्रीय एकल महिला दिनानिमित्त आंतरभारती श्रीरामपूर शाखेच्या वतीने आयोजित 'मेरी बात' व्याख्यानमालेच्या २३ व्या पुष्पात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा जागर नव्या पिढीसमोर करण्यात आला. हा उपक्रम काळाची गरज असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य टी. ई. शेळके यांनी केले. तालुक्यातील मातापूर येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले, साने गुरुजी व खासदार गोविंदराव आदिक यांच्या प्रतिमापूजनाने झाली. आंतरभारतीचे सचिव लेविन भोसले यांनी प्रास्ताविकातून एकल महिला दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. प्रमुख वक्ते प्रा. सुभाष लिंगायत यांनी महात्मा फुले हे महिला शिक्षणाचे आद्य प्रवर्तक असल्याचे सांगत त्यांनी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली, तसेच विधवा विवाह, अस्पृश्यांसाठी शिक्षण आणि सत्यशोधक समाजाच्या स्थापनेद्वारे समाजपरिवर्तन घडवून आणल्याचे नमूद केले. यावेळी महिला शिक्षकांचा ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. बाबुराव उपाध्ये, सुखदेव सुकळे, अरविंद थोरात, प्रा. शिवाजी बारगळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन संगीता गायके यांनी तर आभार प्रा. शिवाजी बारगळ यांनी मानले.

---

## माळवाडगांव सोसायटी निवडणुकीत सर्व जागा बिनविरोध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगांव सेवा सहकारी सोसायटीच्या २०२६ च्या पंचवार्षिक निवडणुकीत उमेदवारी माघारीचे दिवशी १३ जागेसाठी १३ उमेदवारी अर्ज राहिल्याने संस्थेचे सत्ताधारी चेअरमन बाजार समितीचे मा.संचालक गिरीधर आसने यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध झाली आहे.



बिनविरोध निवड झालेले सदस्य पुढीलप्रमाणे सर्वसाधारण खातेदार प्रतिनिधी गिरीधर किसन आसने, ॲड. उमेश दत्तात्रय लटमाळे, शंकर नानासाहेब (भा.) आसने, गोरखनाथ बाबुरांव( खं.) आसने, बापुसाहेब दत्तात्रय (सि.आसने, रामकिसन विठ्ठल ( रा.) आसने, किसन धोंडिबा आसने, वंदना सुरेश चिडे, भटक्या विमुक्त जाती जमाती प्रतिनिधी -भास्कर एकनाथ शिंदे, अनुसूचित जाती जमाती प्रतिनिधी - विठ्ठल खंडू बोर्डे, इतर मागास प्रवर्ग प्रतिनिधी - योगेश रावसाहेब ऊर्फ सुदाम आसने, महिला राखीव प्रतिनिधी शांताबाई रावसाहेब (भा.) आसने आशा विजय (दि.) आसने असे १३ नवनिर्वाचित सदस्य आहेत. माळवाडगांव विविध कार्यकारी सेवा संस्थेचे संस्थापक श्रीरामपूर खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन कै.किसनरांव गोविंदराव आसने यांच्यानंतर दुसऱ्या पिढीतही संस्था त्यांचे चिरंजीव गिरीधर आसने यांच्या एकहाती ताब्यात असुन, त्यांच्या कारभारावर व नेतृत्वावर विश्वास दाखवून सभासदांनी सोसायटीची निवडणूक बिनविरोध केली आहे. या बिनविरोध निवडीबद्दल भाजपाचे राज्य उपाध्यक्ष डॉ सुजय विखे, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, जिल्हा उपाध्यक्ष दीपक पटारे, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, तालुका सरचिटणीस डॉ शंकर मुठे आदिंनी अभिनंदन केले आहे.

---

## अखेर प्राजक्त तनपुरे आमदार अन् गजानन सातभाई उपाध्यक्षपदाच्या खुर्चीवर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी नगर परिषदेच्या निवडणुकीत तनपुरे गटाची सत्ता येऊन भाऊसाहेब मोरे सर हे अध्यक्ष झाले तर उपाध्यक्षपदी गजानन सातभाई यांची निवड करण्यात आली. परंतु खुर्चीचा मोह न धरता गजानन सातभाई यांनी प्राजक्तदादा तनपूरे आमदार झाल्या शिवाय मी उपनगराध्यक्षाच्या खुर्चीवर बसणार नाही. असा संकल्प केला होता. आणि प्राजक्त तनपूरे विधान परिषदेचे बिनविरोध आमदार झाल्याने सातभाई यांचा संकल्प पूर्ण झाला.



या निमित्ताने राहुरी नगरपरिषद कार्यालयात कार्यक्रम आयोजित करून सर्व कार्यकर्ते व नगरसेवक यांच्या उपस्थितीत सातभाई हे उप नगराध्यक्षाच्या खुर्चीवर विराजमान झाले. डिसेंबर महिन्यात राहुरी नगरपरिषद निवडणूक प्रक्रिया पार पडली आणि तनपूरे गटाच्या हाती सत्ता आली होती. नगराध्यक्ष पदी भाऊसाहेब मोरे हे विजयी झाले होते. त्यानंतर उप नगराध्यक्ष पदी गजानन सातभाई यांची निवड करण्यात आली होती.

मात्र त्यावेळी गजानन सातभाई यांनी उप नगराध्यक्षाच्या खुर्चीवर न बसता जोपर्यंत प्राजक्तदादा आमदार होत नाही, तोपर्यंत मी उप नगराध्यक्षाच्या खुर्चीवर बसणार नाही, असा संकल्प केला होता. गजानन सातभाई यांनी उप नगराध्यक्षाच्या खुर्चीवर न बसता शहरातील जनतेचे प्रश्न मार्गी लाऊन आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावले. दरम्यान माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांनी भाजपात जाहिर प्रवेश केला. त्यानंतर त्यांची विधान परिषदेवर आमदार म्हणून बिनविरोध निवड झाली. काल विधानपरिषदेत त्यांचा शपथविधी संपन्न झाला.

गजानन सातभाई यांचा संकल्प पूर्ण झाल्याने दि. २४ जून २०२६ रोजी राहुरी नगरपरिषदेत कार्यक्रम आयोजित करुन गजानन सातभाई हे उप नगराध्यक्षाच्या खुर्चीवर विराजमान झाले. यावेळी गटनेते हर्ष तनपूरे म्हणाले कि, गजानन सातभाई व त्यांचे कुटुंब हे संपूर्ण तनपूरे घराण्याशी एकनिष्ठ राहिले आहेत. गजानन सातभाई हे संपूर्ण तनपूरे कुटुंबीयांचे लाडके आहेत. भविष्यात त्यांच्या हातून आणखी चांगले कामे होतील, असा विश्वास व्यक्त करून हर्ष तनपूरे यांनी सातभाई यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. तसेच नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांचा देखील सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी उप नगराध्यक्ष गजानन सातभाई म्हणाले कि, तनपूरे कुटुंबीयांचा आम्हाला नेहमीच आर्शिवाद मिळाला आहे. आज मी जे काही आहे ते फक्त तनपूरे कुटुंबीयांमुळेच आहे. मी त्यांचा आयुष्यभर ऋणी राहीन. त्यांच्या पाठबळाने नगरपरिषदेच्या माध्यमातून मी शहर विकासासाठी कायम तत्पर राहीन, असे मत गजानन सातभाई यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी माजी नगराध्यक्षा उषाताई तनपूरे, आसाराम शेजूळ, नगरसेवक अविनाश म्हस्के, प्रदिप भूजाडी, प्रशांत डौले, प्रतिक तनपूरे, ड. राहुल शेटे, डॉ. संतोष उदावंत, अरुण साळवे, राजेंद्र उंडे, नयन शिंगी तसेच नंदुभाऊ तनपूरे, प्रकाश भूजाडी, भारत भूजाडी, शहाजी ठाकूर, राजु शेख, रवींद्र आहेर, संजय साळवे, सचिन भोंगळ, किरण साळवे, जिवन गुलदगड, दादु साळवे, संतोष आघाव, महेश उदावंत, नगरसेविका सपना भूजाडी, सुमती सातभाई, मुख्याधिकारी अभिजीत हराळे यांच्यासह सर्वच आजी माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---


### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी दुरगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री श्रीम / मुमताज नशिर शेख रा दुरगाव ता. कर्जत, जि.अहिल्यानगर यांनी नामे श्री श्रीम/ मुमताज नशिर शेख यांचे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू दुरगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि १५/१०/१९८७ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि २२/०४/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यत्कीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक - १२/०५/२०२६

**तहसिलदार कर्जत**

### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी दुरगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री श्रीम / शफी गनी शेख रा दुरगाव ता. कर्जत, जि.अहिल्यानगर यांनी नामे श्री श्रीम/ शफी गनी शेख यांचे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मीळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू दुरगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि ०१/०५/१९८३ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि ०७/०४/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यत्कीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक - १५/०४/२०२६

**तहसिलदार कर्जत**

### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी दुरगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री श्रीम / इकबाल गनी शेख रा दुरगाव ता. कर्जत, जि.अहिल्यानगर यांनी नामे श्री श्रीम/ इकबाल गनी शेख यांचे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू दुरगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि २७/०३/१९८६ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि ०७/०४/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यत्कीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक - १५/०४/२०२६

**तहसिलदार कर्जत**

### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी दुरगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री श्रीम / रफीक गनी शेख रा दुरगाव ता. कर्जत, जि.अहिल्यानगर यांनी नामे श्री श्रीम/ रफीक गनी शेख यांचे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू दुरगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि २०/०५/१९८१ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि ०७/०४/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यत्कीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक - १५/०४/२०२६

**तहसिलदार कर्जत**

### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी दुरगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री श्रीम / हबीजा गनी शेख रा दुरगाव ता. कर्जत, जि.अहिल्यानगर यांनी नामे श्री श्रीम/ हबीजा गनी शेख यांचे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू दुरगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि ०१/०६/१९४५ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि ०७/०४/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यत्कीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक - १५/०४/२०२६

**तहसिलदार कर्जत**

## पान १ वरुन

### लाखोंचे सीसीटीव्ही वर्षभरातच ठप्प!

प्रश्न निर्माण झाला आहे. गुन्ह्यांच्या तपासावर परिणाम – गेल्या काही वर्षांपासून नेवासा हे गुन्हेगारीचे केंद्र बनले आहे. त्यामुळे या शहरांमध्ये सीसीटीव्ही असणे पोलीस प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहे. काही दिवसांपूर्वी मुख्याधिकाऱ्यांवर गोळीबार झाल्याची गंभीर घटना नेवासा येथे घडली होती. या प्रकरणी गुन्हाही दाखल झाला आहे. याशिवाय चोरी, भांडणे, अपघात आणि इतर किरकोळ स्वरूपाच्या घटनाही शहरात घडत असतात. गुन्हेगारांचा माग काढणे, घटनास्थळावरील हालचाली तपासणे आणि पुरावे गोळा करणे यासाठी सीसीटीव्हीची मोठी मदत होऊ शकते. मात्र कॅमेरेच बंद असल्याने पोलिसांच्या तपासावर परिणाम होतो.

### आईच्या कुशीतच थांबला दोन लेकरांचा श्वास...

दहावीत शिक्षण घेणारी शुभश्री आणि अजून बालपण जगत असलेला दादू यांची स्वप्नेही आईसोबत संपल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे. समाजात आर्थिक, मानसिक आणि कौटुंबिक ताणतणाव वाढत असताना अशा घटना केवळ पोलिस तपासाचा विषय राहत नाहीत, तर त्या समाजासाठी आत्मपरीक्षणाची संधी ठरतात. संकटात सापडलेल्या कुटुंबांना वेळेवर आधार, समुपदेशन आणि मदतीचा हात मिळाला असता तर कदाचित ही शोकांतिका टळली असती, अशी हळहळ व्यक्त होत आहे. सध्या पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू असून मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. मात्र ताथवड्यातील हे घर आता तीन जीवांच्या आठवणींनी कायमचे ओसाड झाले आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही.

### लग्नपत्रिकेवर वर-वधूच्या नावापुढे जन्मतारखेची सक्ती?

राज्य सरकारने केली आहे. बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षण व आरोग्यावर परिणाम होत असल्याच सरकारकडून मान्य करण्यात आले आहे. तर बालविवाह रोखण्यासाठी राज्यात कायदा, नियम व विशेष जनजागृती मोहीम राबविली जात असल्याची माहिती देण्यात आलीय. त्यामुळे राजस्थानच्या धर्तीवर लग्नपत्रिकेवर वर-वधूची जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याच्या प्रस्ताव सरकारकडून अभ्यास सुरू करण्यात आला आहे.

### हॉटेल, धाब्यावर पिण्यायोग्य पाणी मोफत द्या

अवघ्या एका वर्षात संपूर्ण यंत्रणा बंद पडल्याने कामाच्या गुणवत्तेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सीसीटीव्ही, वायरिंग, कंट्रोल सिस्टीम आणि इतर साहित्य निकृष्ट दर्जाचे वापरण्यात आले का, असा सवाल उपस्थित होत आहे. जर काम दर्जेदार झाले असते, तर एवढ्या मोठ्या प्रमाणावर यंत्रणा बंद पडली नसती, असे नागरिकांचे म्हणे आहे. शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित असणे आवश्यक आहे. मात्र संबंधित यंत्रणा बंद असल्याने शहरातील नागरिकांच्या सुरक्षेचाही अंमलबजावणी केली नाही तर कारवाई करण्यात येईल असा इशारा तुकाराम मुंडे यांनी दिला. ग्राहकांनी हॉटेलमध्ये आल्यानंतर त्यांना सुरक्षित पाणी, द्रवसाधन, टॉवेल, साबण देणं बंधनकारक आहे, त्यामुळे ग्राहकांचे आरोग्य सुरक्षित राहते, असं तुकाराम मुंढे म्हणाले. राज्यात 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' ही मोहीम राबवण्यात येत आहे. त्यामध्ये आम्ही आतापर्यंत राबवलेल्या तपासण्यांमध्ये गंभीर तुटी आढळून आल्या. अस्वच्छ, अपायकारक परिस्थितीत अन्न तयार करणे, वापरलेल्या तेलामध्ये अन्न तयार करणे, अन्न पदार्थांचे कमी प्रतीचे पॅकेजिंग अशा अनेक गोष्टी दिसून आल्या. गुन्ह्यांच्या तपासावर परिणाम – गेल्या काही वर्षांपासून नेवासा हे गुन्हेगारीचे केंद्र बनले आहे. त्यामुळे या शहरांमध्ये सीसीटीव्ही असणे पोलीस प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहे. काही दिवसांपूर्वी मुख्याधिकाऱ्यांवर गोळीबार झाल्याची गंभीर घटना नेवासा येथे घडली होती. या प्रकरणी गुन्हाही दाखल झाला आहे. याशिवाय चोरी, भांडणे, अपघात आणि इतर किरकोळ स्वरूपाच्या घटनाही शहरात घडत असतात. गुन्हेगारांचा माग काढणे, घटनास्थळावरील हालचाली तपासणे आणि पुरावे गोळा करणे यासाठी सीसीटीव्हीची मोठी मदत होऊ शकते. मात्र कॅमेरेच बंद असल्याने पोलिसांच्या तपासावर परिणाम होतो.

### संगमनेरच्या मागणीला यश!

संगमनेर तालुयातही अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याबत नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात असताना आमदार खताळ यांनी हा प्रश्न सातत्याने विधिमंडळात उपस्थित केला होता. युवकांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या या घातक प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली होती.
राज्य शासनाने जाहीर केलेल्या या निर्णयामुळे अमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधातील कारवाई अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच संगमनेरसह राज्यातील विविध भागांमध्ये अमली पदार्थांचे जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी पोलीस यंत्रणेला अधिक बळ मिळणार असल्याचे मानले जात आहे. दरम्यान, आ. अमोल खताळ यांनी राज्य शासनाच्या या निर्णयाचे स्वागत करत अमली पदार्थांच्या विक्री, तस्करी व सेवनाविरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण राबवून युवकांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी प्रशासनाने अधिक प्रभावी पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### जीएसटी सुधारणा विधेयक स्थगित; बहुमत असूनही सरकारची माघार

सरकारकडून हे विधेयक केवळ तांत्रिक बदलांसाठी असल्याचे सांगण्यात आले. मात्र विरोधकांचा आग्रह कायम राहिल्याने तालिका सभापतींनी विधेयक स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला. प्रमुख बदल व मागणी जीएसटी दर कमी करण्याची मागणी पुन्हा चर्चेत विविध सेवांवरील १८ टक्के जीएसटीवर आक्षेप स्वयंपुनर्विकास प्रकल्पांना करसवलतीची मागणी जीएसटी अंमलबजावणीतील त्रुटींवर सरकारला प्रश्न जीएसटी परिषदेत महाराष्ट्राची भूमिका अधिक ठाम असावी.

# लग्नपत्रिकेवर जन्मतारीख छापणे बालविवाह रोखण्यासाठी प्रभावी पाऊल : डॉ. गावित्रे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : बालविवाहास प्रतिबंध घालण्यासाठी लग्नपत्रिकेवर वधू-वरांची जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याचा निर्णय अत्यंत स्वागतार्ह व समाजहिताचा असल्याचे मत डॉ. अशोक गावित्रे यांनी व्यक्त केले. या निर्णयामुळे विवाह प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येऊन बालविवाह रोखण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कायद्यानुसार मुलींचे विवाहयोग्य वय १८ वर्षे तर मुलांचे २१ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. मात्र काही ठिकाणी अजूनही अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह होत असल्याच्या घटना समोर येतात. अशा परिस्थितीत लग्नपत्रिकेवर जन्मतारीख नमूद केल्यास संबंधितांचे वय सहज तपासता येणार असून प्रशासन, समाजसेवक आणि नागरिकांना बालविवाह रोखण्यासाठी मदत मिळेल.

डॉ. गावित्रे म्हणाले की, अनेकदा चुकीची माहिती देऊन किंवा कागदपत्रांमध्ये फेरफार करून बालविवाह करण्याचे प्रयत्न होतात. मात्र जन्मतारीख सार्वजनिकरित्या प्रसिद्ध झाल्याने अशा प्रकारांना आळा बसेल. बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षणावर परिणाम होतो, आरोग्य धोक्यात येते तसेच आर्थिक, सामाजिक आणि मानसिक अडचणी वाढतात.

बालविवाहमुक्त, सुशिक्षित आणि सशक्त समाज घडविण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असून नागरिकांनी त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार्य करावे, असे आवाहनही डॉ. गावित्रे यांनी केले.

> **देशाला दिशा देणाऱ्या महाराष्ट्रासाठी हास्यास्पद निर्णय : सत्यजित तांबे**
>
> राज्य शासन आता बालविवाह रोखण्यासाठी इतर काही राज्यांच्या पद्धतीचा अवलंब करून महाराष्ट्रातही लग्नपत्रिकेवर नवरा-नवरीच्या नावापुढे जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याच्या विचारात आहे. असा निर्णय घेणे म्हणजे देशाला दिशा देणाऱ्या महाराष्ट्रासाठी हास्यास्पदच ठरेल. एका बाजूला बालविवाह रोखण्यासाठी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, सक्षम यंत्रणा उभारणे आणि व्यापक जनजागृती यांसारखे अनेक प्रभावी मार्ग उपलब्ध असताना अशा प्रतीकात्मक उपायांवर भर देणे योग्य नाही. महाराष्ट्र कधीही इतर राज्यांच्या मागे चालत नाही; उलट देशाला दिशा देण्याचे काम करतो.

# नियमीत योगा करणे ही उत्तम आरोग्याची गुरूकिल्ली : ससाणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : २१ जून जागतिक योगा दिनाचे औचित्य साधून चैतन्य योगा बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या वतीने भव्य प्रमाणात योग साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी नगराध्यक्ष करण ससाणे यांनी आरोग्यासाठी योगाचे महत्व विषद केले.

समाजभूषण प्रा. बालरोगतज्ञ डॉ. कुमार चोथाणी यांनी चैतन्य योगा परिवार या उपक'माबद्दल कौतूक केले. जेष्ठ पत्रकार रमेश कोठारी यांनी चैतन्य योगा ग'ुपने शहरात आरोग्य विषयक उपक'मात सातत्य ठेवले. त्याबद्दल संयोजकांचा गौरव केला. अशोक थोरे यांनी चैतन्य योगा प्रतिष्ठानच्या यशस्वी वाटचालीची माहिती देऊन योगाचे महत्व विषद केले. याप्रसंगी डॉ. ज्योती मोमले यांचा विशेष गौरव करण्यात आला. योगसाधक डॉ. मोनिका संचेती या जिल्ह्यातील उत्कृष्ट सायकलपटू आहेत. त्यांचाी सन्मान डॉ. पडघन यांच्या हस्ते करण्यात आला. विविध प्रकारची वस्तू स्वरूपात देणगी दिल्याबद्दल बाळासाहेब निकम व उद्धव गिरमे, अशोकराव थोरे यांचा सन्मान करण्यात आला. योगसाधक नितीन हारदे यांच्या चिरंजीवाने नुकताच झालेल्या १२ वीच्या परीक्षेत उत्तम यश संपादन केल्याबद्दल सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भागवत लासुरे यांनी केले.



# रविवारी श्रीरामपूरला शेती महामंडळ कामगारांचा भव्य मेळावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ हरेगाव व टिळकनगर मळ्यावरील कामगारांचा भव्य मेळावा श्रीरामपूर येथे शेतकरी मंगल कार्यालय नेवासा रोड येथे २८ जून रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. औद्योगिक न्यायालय अहिल्यानगर यांनी १६ मार्च २०२६ रोजी निकाल देऊन चौथा वेतन आयोग दिनांक १ जानेवारी १९८६ ते डिसेंबर २००७ पर्यंत सेवानिवृत्त कामगारांना लागू करण्याचा आदेश दिला आहे त्या निर्णयामुळे सेवानिवृत्त कामगारांना प्रत्येक कामगारांच्या सेवानिवृत्ती तारखेपर्यंत फरक मिळणार आहे तसेच पाचवा वेतन आयोग देणे बाबत निकालात कोठेही उल्लेख नाही व सहावा वेतन आयोग देण्यासाठी न्यायालयाने दिलेल्या आदेशामध्ये शेती महामंडळाने संघटनेशी तडजोड करावी असा आदेशात उल्लेख आहे शेती महामंडळ कामगारांच्या बाजूने दिलेल्या निकालाच्या विरोधात उच्च न्यायालयात शेती महामंडळ जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी आपल्यालाही आपली बाजू मांडण्यासाठी त्या दृष्टिकोनातून तयारी करणे गरजेचे आहे या सर्व बाबींची सविस्तर माहिती देण्यासाठी हा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. एक जानेवारी १९८६ ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच्या सर्व सेवानिवृत्ती कामगारांचा व मयत कामगारांच्या वारसांचा हा मेळावा आयोजित केला आहे या मेळाव्यात दोन गुंठे जागा व घरे बांधून देण्याची मागणी तसेच रोजंदारी कामगारांना समान कामास समान वेतन ,ग्रॅच्युईटी नुकसान भरपाई इत्यादी केसेस सुरू असण्याची माहिती देण्यात येईल व आंदोलनाची पुढील दिशा ठरविली जाईल कामगारांनी बाहेरगावी राहणाऱ्या कामगारांना मोबाईलदरे संपर्क करून त्यांना ही माहिती द्यावी या मेळाव्यात कामगार नेते ज्ञानदेव पाटील आहेर अविनाश आपटे सुभाष कुलकर्णी भिकन शिंदे हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहे त्यासाठी दोन्ही मळ्यावरील कामगारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अशोक पाटील, भालचंद्र कोल्हटकर आदींनी केले आहे ,

# एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी भेंडा बुद्रुक ग्रामपंचायतीचा पुढाकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : आंतरराष्ट्रीय एकल महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भेंडा बुद्रुक मधील सर्व एकल महिलांचा विमा उतरवणे व एकल महिला बचत गटापैकी उल्लेखनीय व समाजाभिमुख कार्य करणाऱ्या गटांना तीन पारितोषिके देणार असल्याची घोषणा सरपंच सुहासिनी किशोर मिसाळ यांनी केली.




महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षानिमित्त भेंडा बुद्रुक ग्रामपंचायत मध्ये महिला बालविकास विभाग, पंचायत समिती नेवासा, साऊ एकल महिला समिती व भेंडा बुद्रुक ग्रामपंचायतच्या वतीने आंतरराष्ट्रीय एकल महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात सरपंच तथा प्रशासक सुहासिनी मिसाळ यांनी ही घोषणा केली.

प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस उपस्थितांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमास साऊ एकल महिला समितीचे जिल्हा समन्वयक कारभारी गरड,सेंट्रल बँक आर्थिक साक्षरता केंद्र अधिकारी रवींद्र काळे, पोस्ट कार्यलय अधिकारी प्रशांत कराड, बाल विकास प्रकल्प अधिकारी मनीषा नजन, अर्जुन सोनवणे,मीना कदम, ग्राम विकास अधिकारी रेवन्नाथ भिसे,बाबासाहेब गोर्डे, विष्णू फुलारी आदींची उपस्थिती होती.

एकल महिला बचत गटांमार्फत झालेली महिला सक्षमीकरणाची तसेच सामाजिक जाणीवेतून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या भेंडा बुद्रुक मधील बचत गटांना प्रथम ५ हजार,द्वितीय ३ हजार व तृतीय २ हजार रुपयाचे पारितोषिक देणार असल्याचे सरपंच तथा प्रशासक सुहासिनी मिसाळ यांनी जाहीर केले. याप्रसंगी महात्मा फुले यांनी एकल महिला बाबत केलेल्या जीवन कार्याविषयी अंगणवाडी सेविका सुनीता कदम, बचत गतासाठी बँकेमार्फत असणारी कर्ज योजना, लागणारी कागदपत्र, प्रस्ताव सादर करण्याची पद्धत आदिबाबत रवींद्र काळे, पोस्ट ऑफिसच्या योजना ,अपघात विमा सुविधा बाबत प्रसाद कराड ,बचत गट स्थापना, कर्ज योजना, परतफेड, गटाचे साहित्य विक्री बाबत अर्जुन सोनवणे, मीना कदम यांनी माहिती दिली.

# साहिल भळगट सीए उत्तीर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर**, येथील जैन समाजातील साहील संतोष भन्साळी हा सी. ए. च्या अंतिम परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाला आहे. त्याचे कौतुक होत आहे. साहील भन्साळी यांचे शालेय व ११ वी, १२ वी कॉमर्स पर्यंतचे शिक्षण विद्यानिकेतन स्कुल मध्ये झाले. बी. कॉम. ची पदवी परीक्षा त्याने पुणे येथील भारती विद्यापीठ महाविद्यालयातून दिली. सी. ए. परीक्षेच्या अभ्यासासाठी त्याला आहुजा वलेशा सी. ए. असोसिएट्स चे बहुमोल मार्गदर्शन लाभले. साहीलला प्रथम ग'ुप मध्ये १६७ मार्क्स व ग'ुप २ मध्ये १८५ मार्क्स मिळाले आहेत. तो किराणा व्यापारी संतोष शंकरलाल भन्साळी यांचा मुलगा असून स्व. शंकरलालजी भन्साळी व श्रीमती विमलबाई भन्साळी यांचा नातू आहे. या यशाबद्दल चातुर्मास समिती, दिक्षा समितीच्या सदस्यांनी व सकल जैन समाजाने त्यांचे अभिनंदन केले आहे.

# गौरी ढगे सीए उत्तीर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : येथील सावता महाराज रोडवर शिवणकाम करणारे बाबासाहेब ढगे यांची कन्या गौरी बाबासाहेब ढगे ही पहिल्याच प्रयत्नात जिद्द व कष्ट, मेहनतीच्या आधारे सी. ए. परिक्षा उत्तीर्ण झाली आहे. गौरी ढगे ही आय. सी. आय. येथून १६० गुण मिळवून उच्च श्रेणीत यश संपादन केले आहे. तिने एम. कॉम पर्यंतचे पदवीचे शिक्षण चंद्ररूप डाकले वाणिज्य महाविद्यालयातून घेतले. कोणतेही कोचींग क्लासेस न लावता हे यश संपादन केले. गौरीचे वडिल बाबासाहेब ढगे हे सामान्य कुटूंबातील असून अनेक अडीअडचणींवर मात करत त्यांनी गौरी हिला सी. ए. केले. तिला सी. ए. संजय पगारे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. तिचे कौतुक होत आहे. सावता प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजयराव विजयराव कुदळे व सावता रोडवरील व्यापारी बंधूंनी अभिनंदन केले आहे.

## नावात बदल

मी माझे जुने नाव देवयानी गणेश जाधव हे बदलून नूतन नाव देवयानी सोमनाथ जाधव, असे केले आहे. पत्ता : रा. लोणी बु. ता. राहाता, जि. अहिल्यानगर, पिन – ४१३७३६. संदर्भ : महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. एम. २५४१७७५३.

## Change in Name

"I am changing my name from 'Harshal Dnyandeo Avhad ' to Harshal Dnyandev Avhad" for passport issuance. Address: Avhad Vasti Pratappur Tal :Sangamner , Ahmednagar, Maharashtra – 413714, India

## निधन वार्ता

### बाळू चव्हाण



**नेवासा** : पंचायत समितीमध्ये अनेक वर्षांपासून काम करत असलेले कर्मचारी बाळू जगन्नाथ चव्हाण (वय ६०) यांचे अकस्मात निधन झाले. बाळू चव्हाण यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन मुली,एक मुलगा,तीन बहिणी,दोन भाऊ असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रकाश चव्हाण व सदानंद चव्हाण,नगरपंचायत कर्मचारी सुमन चव्हाण यांचे ते बंधू तर अनिल चव्हाण यांचे ते वडील होते.

### छगन गवळी



**चांदा** : नेवासा तालुक्यातील चांदा येथील नाभिक समाजाचे छगन मारुती गवळी यांचे (वय ८७) नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नाभिक समाजाचे कार्यकर्ते व लोककलावंत बबनराव गवळी व सुनील गवळी यांचे ते वडील होत.

# लोणीच्या औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयास पीएच.डी. संशोधन केंद्राची मान्यता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा ग्रामीण औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून फार्मसी विषयातील पीएच.डी. संशोधन केंद्र म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या मान्यतेमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील वाटचालीला नवे बळ मिळाले असून ग्रामीण भागातील उच्च शिक्षण व संशोधनाला मोठी चालना मिळणार आहे. महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षण, अत्याधुनिक प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकवर्ग आणि संशोधनाभिमुख वातावरणाच्या बळावर ही मान्यता प्राप्त केली आहे. पीएच.डी. संशोधन केंद्राच्या स्थापनेमुळे औषधनिर्माण शास्त्रातील नवसंशोधन, उद्योगाभिमुख संशोधन प्रकल्प आणि उच्च शिक्षणाच्या संधींना नवी दिशा मिळणार आहे. या मान्यतेमुळे संशोधक विद्यार्थ्यांना प्रवरानगरमध्येच पीएच.डी. अभ्यासक्रम आणि संशोधन कार्य करण्याची संधी उपलब्ध होणार असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन सहकार्यालाही प्रोत्साहन मिळणार आहे. तसेच औषधनिर्माण क्षेत्रातील नवनवीन संकल्पना, संशोधन आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांना गती मिळून समाजोपयोगी संशोधनाला चालना मिळणार आहे.

> मंत्री विखे यांच्या माध्यमातून कौशल्य आधारित शिक्षणाबरोबरच संशोधनाला चालना देण्यासाठी विविध सेवा सुविधा या उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे आज प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेतील प्राध्यापक यासह विद्यार्थ्यांना संशोधनाला मोठी संधी प्राप्त झाली आहे. याशिवाय संस्थेच्या माध्यमातून त्यांना विशेष असे प्रोत्साहनही दिले जाते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संशोधनाची नवी दालने खुली करणारी ही मान्यता प्रवरा ग्रामीण औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयासाठी आणखी एक मानाचा तुरा ठरली आहे.
>
> **डॉ.सुस्मिता विखे**
> **मुख्यकार्यकारी अधिकारी**
> **प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था,लोणी**

# संतप्त शेतकऱ्यांचा मध्यरात्री वीज उपकेंद्रावर धडक मोर्चा
# अपुऱ्या व खंडित वीजपुरवठ्याने संताप अनावर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : शेतीपंपांसाठी केवळ सहा तास वीजपुरवठा आणि त्यातही वारंवार होणाऱ्या खंडित पुरवठ्यामुळे संतप्त झालेल्या कायगाव (ता. गंगापूर) परिसरातील शेतकऱ्यांनी शनिवारी (दि. २०) मध्यरात्री गणेशवाडी येथील वीज उपकेंद्रावर धडक मोर्चा काढत महावितरणच्या कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. यावेळी शेतकऱ्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना जाब विचारत नियमित व सुरळीत वीजपुरवठ्याची मागणी केली.

महावितरणकडून यापूर्वी शेतीपंपांसाठी दररोज आठ तास वीजपुरवठा केला जात होता. मात्र गेल्या दोन महिन्यांपासून हा कालावधी कमी करून केवळ सहा तासांवर आणण्यात आला आहे. त्यातही आठवड्यातून तीन ते चार दिवस विविध कारणे देत वीजपुरवठा पूर्णपणे बंद ठेवला जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. उर्वरित वेळेतही तार तुटणे, वीज खांब कोसळणे, तांत्रिक बिघाड किंवा तातडीचे भारनियमन यामुळे पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शेतीचे मोठे नुकसान होत आहे. सध्या शेतीसाठी पाण्याची उपलब्धता असतानाही विजेअभावी पंप बंद पडत आहेत. आधीच पावसाने दडी मारल्याने उसासह भाजीपाला आणि इतर पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत नैसर्गिक संकटासोबतच प्रशासनाच्या गलथान कारभार फटका शेतकऱ्यांना बसत असल्याने त्यांच्यात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी मध्यरात्री मोठ्या संख्येने शेतकरी गणेशवाडी वीज उपकेंद्रावर एकत्र आले. वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे आम्ही वीज पुरवठा बंद ठेवतो असे तेथील ऑपरेटरने सांगितले. मात्र या उत्तराने शेतकऱ्यांचा संताप आणखी वाढला. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी फोन उचलला नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. त्यामुळे प्रशासनाच्या उदासीन भूमिकेबाबतही शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. पूर्वीप्रमाणेच शेतीपंपांसाठी किमान आठ तास नियमित व अखंडित वीजपुरवठा सुरू करावा, वारंवार होणारे खंडित पुरवठे तातडीने थांबवावेत आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी केली आहे.

> **आमदारांच्या पत्राला केराची टोपली ?**
>
> गंगापूरचे आमदार प्रशांत बंब यांनी महावितरणच्या मुख्य अभियंत्यांना पत्र पाठवून कृषीपंपांना नियमित व सुरळीत वीजपुरवठा करण्याची मागणी केली होती. तसेच लोडशेडिंगचे वेळापत्रक पूर्वसूचनेसह पारदर्शकपणे जाहीर करणे, पावसाळ्यापूर्वी जीर्ण ट्रान्सफॉर्मर, वीज खांब, डीपी आणि तारांची तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करणे अशा सूचनाही त्यांनी दिल्या होत्या. मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना अजूनही अपुरा व खंडित वीजपुरवठा सहन करावा लागत असल्याने आमदारांच्या सूचनांकडे महावितरण प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून प्रशासनाविरोधातील रोष दिवसेंदिवस वाढत आहे


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि .२५ जून २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२९ १५६ ११० | २-६ | १२३ ३६७ ५५६ | २४-८६-०३-९५-६७ |

**कल्याण**
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १९० ४६० २८० | ०-५ | १४० २३० ७८० | ०१-२५-४३-७९-५८ |

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १३० १४९ ११२ | ४-२ | १३८ २४६ २२८ | ४०-६२-७१-३९-२५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 13/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 470 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 20/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 398 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 4 | |

## द•ख•ल

### संगीत परीक्षेत शौर्य देशमुख केंद्रात प्रथम

**अहिल्यानगर :** अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने एप्रिल मे २०२६ सत्रात घेण्यात आलेल्या संगीत परीक्षा (तबला) मध्ये चि.शौर्य वैभव देशमुख यांनी प्रवेशिका पूर्ण (तबला) परीक्षेत विशेष योग्यतेसह केंद्रात प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. चि.शौर्य यांना या यशासाठी आरोही संगीत विद्यालयाचे संचालक स्वप्निल खराडे व शितल खराडे यांच्यासह वडील वैभव देशमुख व आई कल्पना देशमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



### खरीपासाठी कृषी विभागाचा हातभार जेऊर मंडळात बियाणांचे वाटप



**नगर तालुका :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने जेऊर मंडळामध्ये विविध पिकांच्या बियाणांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे खरीप पेरणीसाठी सज्ज झालेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कृषी विभागामार्फत मिनिकिट मूग व तूर, तसेच प्रमाणित मूग, बाजरी, उडीद व मका बियाणांचे वितरण करण्यात आले. याशिवाय बाजरी, मका, तूर, सोयाबीन व मूग या पिकांच्या प्रत्यक्षिकांसाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन निवड प्रक्रिया राबवून लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. मंडळ कृषी अधिकारी श्रीमती माधवी घोरपडे यांनी लाभार्थी शेतकऱ्यांना योजनांची माहिती देत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादन वाढविण्याचे आवाहन केले. खरीप हंगामासाठी उपलब्ध झालेल्या बियाणांमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून कृषी विभागाच्या या उपक्रमाचे शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे.

### 'रयत'च्या समितीवर ॲड. रवींद्र शितोळे

**अहिल्यानगर :** रयत शिक्षण संस्थेच्या स्कूल कमिटीवर सुप्रसिद्ध वकील व सामाजिक कार्यकर्ते ॲड. रवींद्र प्रल्हादराव शितोळे यांची निवड करण्यात आली. रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडके साहेब यांनी नियुक्तीपत्र देऊन त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा केली आहे. ॲड. शितोळे यांच्या आज पर्यंतच्या कार्याची दखल घेऊन त्यांची रयतच्या शाळा समितीवर सदस्य म्हणून निवड हि अभिमानाची गोष्ट आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या अनुभवाचा व कार्यक्षमतेचा निश्चितच लाभ होईल. यावेळी आ. रोहित पवार आ. दादाभाऊ कळमकर, अरुण कडू, बाबासाहेब भोस, विकास देशमुख, ज्ञानदेव पांडुळे यांनी अभिनंदन केले.



### एस.टी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**अहिल्यानगर :** प्रवाशांच्या सोयीसाठी तसेच डिजिटल व्यवहारांना चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या एस.टी. स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जनसेवक स्वप्निलदादा शिंदे यांच्या पुढाकारातून व स्वप्निलदादा शिंदे मित्र मंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये तीन दिवसांत मोठ्या संख्येने नागरिकांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली. दि. २२ ते २४ जून २०२६ या कालावधीत हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू असलेल्या शिबिरात नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला. याशिवाय हे कार्ड आधार कार्ड, मोबाईल क्रमांक किंवा पॅन कार्डशी लिंक करता येत असल्याने सर्व व्यवहारांची सुरक्षित व पारदर्शक नोंद ठेवणे शक्य होणार आहे. शासनाच्या डिजिटल उपक्रमांना बळकटी देणाऱ्या या योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी उत्साहाने प्रतिसाद दिला. शिबिरादरम्यान नोंदणीसाठी नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

### हातोळण गावची कीर्ती मिसाळ पहिली वकील

**अहिल्यानगर :** हातोळण, औरंगपूर (ता. आष्टी) येथील कायद्याची पदवी घेणारी पहिली तरुणी म्हणून कीर्ती बाळासाहेब मिसाळ हिने बहुमान मिळविला. एलएलबीचा नुकताच निकाल लागला असून, तिने घवघवीत यश मिळविले आहे. कीर्ती बाळासाहेब मिसाळ ही सीना नदी काठावरील हातोळण येथील रहिवासी आहे. तिचे प्राथमिक शिक्षण हातोळण, घोगरगाव (ता. श्रीगोंदा) व अहिल्यानगर येथील रेसिडेन्सिअल हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर तिने खडतर परिश्रम घेत अहिल्यानगर लॉ कॉलेजमधून एलएलबीची पदवी घेतली. हातोळण गावातील ती पहिली वकील ठरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब मिसाळ यांची कन्या आहे. सरपंच भारती मिसाळ यांची भगिनी आहे. तिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



### प्रा. शंकर अंदानी यांची निवड

**अहिल्यानगर :** राजर्षी शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'लोकराजा राजर्षी शाहू महाराज पहिले अखिल भारतीय संवाद परिषद'च्या अध्यक्षपदी साहित्य, समाजकारण आणि लेखा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे अहिल्यानगरचे सुपुत्र सीए (डॉ.) प्रा. शंकर घनशामदास अंदानी यांची निवड करण्यात आली आहे. शुक्रवार, दि. २६ जून रोजी कोल्हापूर येथील दसरा चौकातील मोहमेडन एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात हा सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमात 'लोकराजा राजर्षी शाहू पुरस्कार-२०२६' वितरण समारंभाचेही आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला पदश्री उदय देशपांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. परिषदेत राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्य, सामाजिक सुधारणा, शिक्षणविषयक धोरणे आणि समतावादी विचारसरणीवर विविध तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. परिषदेचे संयोजक कमलाकर वर्टेकर यांनी ही माहिती दिली.



# जात, धर्म आणि पंथाच्या पलीकडे मैत्रीचे नाते!

## किडनी विकाराने त्रस्त स्वच्छतादुताला केली संवगड्यांनी आर्थिक मदत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कर्जत :** आपला सहकारी मागील काही दिवसांपासून श्रमदानासाठी का येत नाही? याची चर्चा इतर सहकाऱ्यांमध्ये घडते. अत्यंत गरीब कुटुंबातील तो सहकारी त्याच्याकडे ना फोन, ना लँडलाईन. मग शेजारी असलेल्या मित्राला खबरबात घेण्याची जबाबदारी दिली जाते. आणि त्याच वेळी आपल्या सोबत असणाऱ्या मित्राला एका गंभीर आजाराने ग्रासल्याची माहिती मिळली. कौटुंबिक परिस्थिती सामान्य असल्याने अवघ्या काही मिनिटात त्याच्या उपचारासाठी मोठी रक्कम उभारण्याची मोहीम यशस्वीपणे पार पडते. सहकाऱ्याचे हे मित्रप्रेम पाहुन तो भावूक झालाच पण त्याचे नातेवाईकांसह मित्र-परिवार देखील या अनपेक्षित मदतीने गहिवरले.

रज्जाक तैनूर पठाण हा कर्जतच्या सर्व सामाजिक संघटनेचा कार्यकर्ता. मागील पाच वर्षांपासून ही संघटना वृक्षसंवर्धनात क्रांती घडवत आपले अखंड श्रमदान आजमितीस पार पाडत आहे. रज्जाक हा आपले योगदान देत आहे. वास्तविक पाहता तो ज्या ठिकाणी श्रमदान असते. त्या ठिकाणी ताशाच्या निनादातून पर्यावरण संवर्धनाच्या कार्याचा जागर करत असतो. यासह श्रमदानात देखील सहभागी होतो. मागील काही दिवसांपासून तो गैरहजर राहत असल्याने त्याची उणीव सहकारी मित्रांना जाणवली. अशिक्षित असल्याने त्याला मोबाईल देखील वापरता येत नसल्याने त्याची चौकशी कशी करावी हा प्रश्न सहकारी मित्रांसमोर उभा राहिला. त्याची अधिक चौकशी केली असता त्यास एका गंभीर आजाराने ग्रासल्याने प्रकृती बिघडली असल्याचे समजताच सर्वच मित्रांनी तात्काळ त्याच्या घराकडे धाव घेतली. कुटुंबाची हलाखीची परिस्थिती उपचाराचा अवाजवी खर्च पाहता अवघ्या काही मिनिटातच ज्याच्या-त्याच्या आर्थिक क्षमतेनुसार सहकाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने मोठी रक्कम जमा करीत मदतीचा हात पुढे केला. यावरच ते न थांबता त्यांनी संबंधित उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची भेट घेत रज्जाकची प्रकृती आणि त्याच्या आजारांविषयी माहिती घेत त्यांच्या कुटुंबास देखील मानसिक आधार दिला. शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर रज्जाक पठाण घरी सुखरूप परतला. त्यावेळी त्याच्या सहकाऱ्यांनी त्याची घरी जाऊन आस्थेवाईकपणे विचारपुस केली. त्यावेळी एकमेकाना पाहत काहींनी आपल्या आनंदाश्रूंना वाट देखील मोकळी करून दिली.

**हा पुनर्जन्म माझ्या सहकाऱ्यांमुळेच : रज्जाक पठाण**

मला अचानक त्रास झाला आणि प्रकृती अस्वस्थ असल्याने मी श्रमदानास जाऊ शकलो नाही. मात्र या सहकाऱ्यांनी मला शोधत या मरणासन्न अवस्थेत खूप मोलाची मदत दिली. या काळात नक्कीच कुटुंबाला देखील मानसिक आणि आर्थिक आधार या सर्व सहकाऱ्यांमुळे मिळाला. आम्ही एक कुटुंबासारखेच सर्व श्रमप्रेमीं राहत असून त्याची प्रचिती देखील माझ्या सारख्या गरिबाला मिळाली. रज्जाक अशिक्षित असल्याने त्याची जन्मतारीख देखील माहित नव्हती. यावर्षी रज्जाकचा पहिला वाढदिवस ५६ व्या वर्षी सर्व सामाजिक संघटनेने साजरा केला.

## आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये शुक्रवारी बालरोग मोफत तपासणी शिबिर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे शुक्रवार दि.२६ जून २०२६ रोजी सकाळी १० ते २ यावेळेत बालरोग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिलकुमार गुट्टे, पेडियाट्रीक सर्जन डॉ. रूपेश सिकची, बालरोग तज्ज्ञ डॉ. वैभवी वंजारे शिबिरात तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये बालरोगावर अद्ययावत उपचार सुविधा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलमध्ये नवजात शिशुंसाठी २६ बेडचा अद्ययावत एन.आय.सी.यु. आहे. नवजात बाळाच्या श्वासोच्छ्वासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी.एस.(श्वसन दाह), काविळीसाठी फोटो थेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवांशिक व जन्मजात आजारांचे निदान, लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, २४ तास पॅथोलॉजी लॅब, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तपासणी मशीन, २४ तास तज्ज्ञ डॉक्टर, महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत शस्त्रक्रिया सुविधा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत.

हॉस्पिटलमध्ये सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जातात. सरकमसीजन (सुंता) ७५०० रूपये, हायड्रोसील १२,७०० रूपये, पेंडिक्स १४,५०० रूपये, जांघेचा हर्निया १४,००० रूपये, बेंबीचा हर्निया शस्त्रक्रिया १०,६५० रूपयात करण्यात येतात. औषध खर्च वेगळा असेल. सोनोग्राफी, रक्त, लघवी तपासण्या ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जातील. आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपये, एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर.आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. ४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सँम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते.

## शाकाहारी टिफीन स्पर्धेत प्राची थिगळे प्रथम

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** प्रत्येक महिलेमध्ये पाककलेचे गुण असतात. कुटुंबातील प्रत्येक सदस्याला सकस, ताजे आणि पौष्टिक अन्न देण्यासाठी त्या स्वयंपाक घरात अतिशय आपुलकीने स्वयंपाक करतात. सध्याच्या जंक फूडच्या काळात मुलांना शुद्ध शाकाहारी पौष्टिक टिफीन देताना महिला कल्पकता दाखवतात. त्यामुळे मुलं घरचा टिफीन आनंदाने खातात. सुगरण महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी जय आनंद महावीर युवक मंडळाने आयोजित केलेल्या स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला. महिलांना चांगल्या रेसिपींची माहिती झाली. अशा स्पर्धांतून महिलांना प्रोत्साहन मिळण्यास मदत होते, असे प्रतिपादन सिमा राहुल मुनोत यांनी केले.

नवी पेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने महिलांसाठी पौष्टिक शाकाहारी टिफीन स्पर्धा नुकतीच ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राची अमोल थिगळे यांना मिळाला. द्वितीय क्रमांक उषा नितीन शेठिया, तृतीय क्रमांक शिल्पा पियुष मुथ्था तर उत्तेजनार्थ पारितोषिक शैला सुरेश सोनसळे, वर्षा विशाल गुंदेचा, सोनल तरटे, कोमल पवार यांना मिळाले. सर्व विजेत्यांना रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी सिमा मुनोत, स्पर्धेच्या परीक्षक राणी शरद मुथा, मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, प्रमोद गांधी आदी उपस्थित होते. शैलेश मुनोत म्हणाले की, नगरच्या सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेले जय आनंद महावीर युवक मंडळ यंदा रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. यंदाचा गणेशोत्सव आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्याचे नियोजन आहे. वर्षभर दर महिन्याला विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. महिलांसाठी मंडळ कायम विविध उपक्रम राबवित असते. शाकाहारी पौष्टिक टिफीन बनवा स्पर्धेतून महिलांच्या पाक कौशल्याला व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. ऑनलाईन माध्यमातून स्पर्धा घेतल्याने अधिक महिलांना सहभागी होता आले. स्पर्धेच्या ठिकाणी येण्याजाण्याचा त्यांचा वेळ वाचला. सर्वच स्पर्धकांनी अतिशय उत्तम रेसिपी सादर केल्या. कार्यक्रमाच्या शेवटी आनंद मुथा यांनी आभार मानले.

## महिलांची छेडछाड : एस.पीं.ना निवेदन आरोपींना तडीपार करण्याची मागणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील सर्जेपुरा परिसरात महिलांची छेडछाड, शिवीगाळ, दमदाटी तसेच नागरिकांना त्रास देण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप करत परिसरातील महिलांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय गाठले. संबंधित सराईत गुन्हेगारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी तसेच त्यांना तातडीने तडीपार करण्यात यावे, अशी मागणी महिलांनी निवेदनाद्वारे केली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सर्जेपुरा येथील महेश भास्कर काळोखे व दीपक काळोखे हे दोघेही सराईत गुन्हेगार असून त्यांनी परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. किरकोळ कारणांवरून नागरिकांना मारहाण करणे, महिलांची छेडछाड करणे, शिवीगाळ व दमदाटी करणे, खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकविण्याच्या धमक्या देणे तसेच दहशतीच्या बळावर नागरिकांना मानसिक त्रास देणे असे प्रकार सातत्याने घडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच संबंधित आरोपींविरुद्ध यापूर्वी कोतवाली पोलीस ठाणे आणि तोफखाना पोलीस ठाण्यात सात ते आठ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यांची यादी महिलांनी पोलीस अधीक्षकांना दिली.

याप्रकरणी कठोर कारवाई न झाल्यास सर्जेपुरा परिसरातील महिला व ग्रामस्थ लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा दिला आहे.

## पल्स पोलिओ जनजागृतीसाठी शहरातून भव्य रॅली

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**अहिल्यानगर :** महानगरपालिका, जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्र व जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पल्स पोलिओ जनजागृती अभियानांतर्गत भव्य रॅली काढण्यात आली. रविवारी (दि.२८ जून) रोजी अहिल्यानगर सर्वत्र लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर रॅलीद्वारे बालकांना पोलिओचा डोस पाजून समाज पोलिओमुक्त करण्याचे आवाहन करण्यात आले.

या रॅलीचा शुभारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय, स्टेशन रोड येथून करण्यात आला. रॅलीचे उद्घाटन आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर व मातांच्या उपस्थितीत फुगे सोडून झाले. रॅली मधील विद्यार्थ्यांनी चौका-चौकात पोलिओच्या जागृतीसाठी पथनाट्य सादर केली. याप्रसंगी जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे, जनआरोग्य समितीच्या सदस्या विद्या तन्वर, जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, अनिल गांधी, अमित मुनोत, पूजा पातुरकर, रिया पवार नुतन गुगळे, मुख्याध्यापक विजय दिघे, जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख व डॉ. नितीन जगताप उपस्थित होते.

शिवनेरी चौक व गवळीवाडा परिसरातून निघालेल्या या रॅलीत विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी दो बूंद पोलिओ के, पोलिओला नाही म्हणा असे फलक हात घेऊन जनजागृती केली.

संजय गुगळे म्हणाले की, पोलिओमुक्त समाजासाठी सर्वांचा पुढाकार महत्त्वाचा आहे. पल्स पोलिओ लसीकरण करणे आवश्यक असून पोलिओमुक्त अहिल्यानगर ही महानगरपालिकेची संकल्पना आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी आपल्या ५ वर्षांखालील मुलांना लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमासाठी आरोग्य सेविका, शिक्षक व सर्व परिचारिका यांनी मोलाचे सहकार्य केले. ही रॅली यशस्वी होण्यासाठी सुवर्णा शेलार यांच्यासह परिचारिका व आशा स्वयंसेविका यांनी परिश्रम घेतले.

## तपोवन रोडवर घरफोडी; पाच महिलांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** तपोवन रोडवरील शिवाजीनगर भागात एका बंद घराचे कुलूप तोडून महिला चोरट्यांनी रोख रक्कमेसह सोन्याचे दागिने चोरून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. याबाबत मिळालेली सविस्तर माहिती अशी की, शिवाजीनगर येथील हनुमान मंदिरासमोरील एका अपार्टमेंटमध्ये राहणारे सेवानिवृत्त नागरिक सचिन बाबासाहेब दहीफळे यांच्या घरात ही चोरी झाली. सायंकाळच्या सुमारास दहीफळे कुटुंब काही कामानिमित्त बाहेर गेले असताना, आरोपी महिला स्वाती बाबासाहेब सोनवणे हिने तिच्या इतर चार अनोळखी महिला साथीदारांसह घरात प्रवेश केला. या महिलांनी बेडरूममधील कपाटाचे कुलूप तोडून आतील ९ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम आणि ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने ज्यात बोरमाळ, मंगळसूत्र, अंगठी आणि कानातले जोड होते, असा एकूण ९९ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

हा प्रकार लक्षात आल्यानंतर न्यायालयाच्या आदेशावरून तोफखाना पोलीस ठाण्यात स्वाती सोनवणे आणि तिच्यासोबत असलेल्या इतर चार अज्ञात महिलांविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गॉटला हे करत असून पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे महिला चोरट्यांचा माग काढत आहेत. भरवस्तीत महिलांनी मिळून केलेल्या या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अमली पदार्थांची खुलेआम सर्रास विक्री

## भाजपा पदाधिकाऱ्यांचा एस.पी. कार्यालयावर मोर्चा काढून ठिय्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**अहिल्यानगर :** जिल्ह्यात व शहरात सर्वच भागांमध्ये सर्रास अमली पदार्थांची विक्री होत असल्याने तरुण पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होत आहे. तरुणांच्या व्यसनाधीनतेमुळे मोठ्या प्रमाणात गुन्ह्यामध्ये वाढ होत असून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. देशाचे भविष्य असणारी तरुण पिढी अशी वाया गेली तर देशाचे भवितव्य धोक्यात येईल. त्यामुळे पोलीस प्रशासनाने तातडीने जिल्ह्यात अमली पदार्थ विक्रेत्यांना पकडून त्यांच्यावर कडक कारवाई करावी. पोलीस अधीक्षकांनी सर्व अवैध धंद्यांवर आपले कडक कारवाई करावी. अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या वतीने पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्याकडे केली.

अहिल्यानगर शहर व जिल्हा भाजपाच्यावतीने जिल्ह्यात सर्वत्र होत असलेल्या अमली पदार्थांच्या विक्री विरोधात व तरुणांमध्ये वाढत चाललेल्या व्यसनाधिनतेमुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलीस प्रशासनाने त्वरित संबंधितांवर कडक कारवाई करावी, या मागणीसाठी पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढला. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यावेळी उपलब्ध नसल्याने संतप्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दारातच धरणे आंदोलन करत ठिय्या दिला.

शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोर्हि हते, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग व उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी सुमारे दोन तास आंदोलन केले. या आंदोलनात शहर व जिल्ह्यातील पदाधिकारी, नगरसेवक, महिला पदाधिकारी, युवा उपस्थित होते. यावेळी 'युवाशक्ती बचाओ देश बचाओ...', 'अमली पदार्थ हद्दपार झालेच पाहिजे', 'दारू बंदी, हप्ते बंदी झालीच पाहिजे' अशा घोषणा दिल्या. यावेळी पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी जिल्ह्यात अमली पदार्थांविरोधात विशेष मोहीम त्वरित सुरू करू, असे आश्वासन दिले. यावेळी अनिल मोहिते म्हणाले, अमली पदार्थ सहज कुठेही टपऱ्यांवर उपलब्ध होत असल्याने तरुण पिढी व्यसनाधीन झाली आहे. त्यामुळे अनेकांनी आत्महत्या केली असून, अनेक कुटुंब उध्वस्त झाली आहेत. वाढत्या व्यसनाधिनतेमुळे जिल्ह्याचा 'उड़ता पंजाब' होतो की काय? असा धोका निर्माण झाला आहे. अमली पदार्थांच्या विरोधात जनजागृती करण्यासाठी पोलीस प्रशासनाने शाळा, महाविद्यालयांमध्ये बैठका घ्याव्या तसेच पानटपयांची तपासणी करावी. मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जसे अमली पदार्थ विरोधात कारवाई करण्याचे आदेश देऊन विशेष पथक निर्माण केले तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातही करावे, अशी मागणी करून अमली पदार्थ व अवैध धंद्यांवर पोलीस अधीक्षक यांनी आपले 'सुदर्शन चक्र' फिरवावे व हे धंदे बंद करावेत अन्यथा शांत न बसता याहून अधिक तीव्र आंदोलन करेल व प्रसंगी कायदाही हातात घेईल, असा इशारा दिला. दिलीप भालसिंग म्हणाले, पोलीस प्रशासनाच्या हलगर्जीमुळे जिल्ह्यात अवैध धंदे व आमली पदार्थांची विक्री जोमात आहे. हे अवैध धंदे त्वरित बंद झाले पाहिजे. मात्र पोलीस प्रशासनच अवैध धंदे करणाऱ्यांना पाठीशी घालत आहेत. हे चुकीचे असून त्वरित थांबले पाहिजे, भाजप आता शांत बसणार नाही. प्रास्ताविक जिल्हा सरचिटणीस निखिल वारे यांनी केले. यावेळी महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे, युवा मोर्चा अध्यक्ष ऋदेश अंबाडे, नगरसेवक उदय कराळे, राहुल शिंदे, बाबासाहेब सानप, वैशाली चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले.

## द • ख • ल

## प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालय बारामतीच्या अनुषंगाने हरकती सादर करा

**पुणे :** महसूल व वन विभागाच्या आदेशानुसार प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालय बारामतीबाबत नागरिकांनी आपल्या हरकती व सूचना जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ८ जुलै २०२६ पर्यंत सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालय बारामतीच्या कार्यक्षेत्रातील बारामती, इंदापूर, आणि दौंड तालुक्याचा समावेश करण्यात आला आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात पुणे शहर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, हवेली, शिरुर, पुरंदर, जुन्नर, भोर आणि राजगड या तालुक्याचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील तालुक्यातील तालुक्यांची संख्या १४ असून याकरिता जिल्हा पुणे असणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी दिली आहे.

## राष्ट्रीय स्तरावरील विभागीय शिखर परिषद २५ जून रोजी आयोजन

**पुणे :** संरक्षण मंत्रालयाच्या संरक्षण उत्पादन विभाग, भारत सरकार यांच्या वतीने संरक्षण उत्पादनातील आत्मनिर्भरतेवरील राष्ट्रीय स्तरावरील विभागीय शिखर परिषद या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन २५ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कौन्सिल हॉल, विभागीय आयुक्त कार्यालय, विधान भवन, पुणे येथे करण्यात आले आहे. सदर कार्यशाळेचे अध्यक्षस्थान संरक्षण उत्पादन विभागाचे सचिव भूषविणार असून, केंद्र सरकार, राज्य सरकार आणि खासगी उद्योग यांच्यात समन्वय साधून देशातील संरक्षण उत्पादन क्षमता अधिक बळकट करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. कार्यशाळेत घटक-स्तरीय उत्पादन , नवसंशोधन आणि स्वदेशीकरण यांना चालना देणाऱ्या धोरणांवर चर्चा होणार आहे. तसेच संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेचा राष्ट्रीय दृष्टिकोन, केंद्र व राज्य शासनातील समन्वय, प्रादेशिक पायाभूत सुविधांचा विस्तार आणि उद्योग क्षेत्रातील संधी यावरही विचारमंथन करण्यात येणार आहे. पुणे विभागातील संरक्षण क्षेत्राशी संबंधित उद्योग, घटक उत्पादक आणि भागधारकांना या परिषदेत सहभागी होण्याचे आवाहन पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक संदीप रोकडे यांनी केले आहे.

## वळती विविध विकास कार्यकारी सोसायटीच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांची बिनविरोध निवड

**वळती :** वळती विविध विकास कार्यकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी श्री. अशोक विठ्ठल खंडागळे यांची तर उपाध्यक्षपदी सौ. मंगल पंढरीनाथ लोखंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे वळती गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून



दोन्ही पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नव्याने निवड झालेल्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली सोसायटीची प्रगती होऊन शेतकरी, सभासद व सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे काम होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आंबेगाव तालुकाध्यक्ष धोंडीभाऊ भोर, विविध कार्यकारी सोसायटीचे सर्व संचालक, पदाधिकारी तसेच वळती गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. वळती ग्रामस्थांच्या वतीने अध्यक्ष अशोक विठ्ठल खंडागळे व उपाध्यक्ष मंगल पंढरीनाथ लोखंडे यांना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या असून त्यांच्या नेतृत्वाखाली सोसायटी विकासाची नवी वाटचाल करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## प्रशासकीय कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू करण्याची मागणी

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील सर्व शासकीय व प्रशासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू करण्यात यावी, अशी मागणी निरगुडसर गावचे सरपंच रवींद्र वळसे पाटील यांनी प्रशासनाकडे केली आहे. याबाबत लवकरच प्रशासनाकडे पत्र व्यवहार करणार असल्याचे वळसे पाटील यांनी सांगितले तालुक्यातील अनेक शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत नियमितपणे उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार होत आहेत. सकाळी लवकर विविध कामांसाठी ग्रामीण भागातील नागरिक कार्यालयांमध्ये येतात. मात्र संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी वेळेत उपस्थित नसल्याने नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. विशेषतः दूरवरच्या गावांमधून येणाऱ्या नागरिकांना प्रवासाचा खर्च, वेळेचा अपव्यय आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे नागरिकांची कामे रखडतात. परिणामी प्रशासनाविषयी नाराजी वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. यावर उपाय म्हणून तालुक्यातील सर्व प्रशासकीय कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणाली कार्यान्वित करावी, अशी मागणी सरपंच रवींद्र वळसे पाटील यांनी केली आहे. बायोमेट्रिक प्रणालीमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची अचूक नोंद राहील. तसेच कोणता अधिकारी किंवा कर्मचारी कोणत्या वेळेस कार्यालयात उपस्थित झाला, याची माहिती प्रशासनाला सहज उपलब्ध होईल. त्यामुळे कार्यालयीन शिस्त वाढण्यास मदत होऊन नागरिकांची कामे वेळेत मार्गी लागतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रशासनाने नागरिकांच्या हिताचा विचार करून तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणाली तातडीने लागू करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडूनही करण्यात येत आहे.

# मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नेमणूक करण्याचे राजकीय पक्षांना आवाहन

### विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (एसआयआर) बाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास जिल्ह्यात राबविण्यास सुरुवात झाली आहे. याकरिता सुमारे ८ हजार ४१७ बीएलओ आणि विविध राजकीय पक्षांचे ४ हजार ५५७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए)या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. तथापि अद्यापही विधानसभा मतदारसंघामध्ये काही राजकीय पक्षांनी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नेमणूक केलेली नाही, तरी एसआयआर प्रकियेची संपूर्ण माहिती होण्याच्यादृष्टीने राजकीय पक्षांनी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची लवकरात लवकर नेमणूक करावी, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी केले.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी



कार्यालय येथे आयोजित राजकीय पक्षांसोबतच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी तहसीलदार शीतल मुळे-भामरे, स्वप्नील खोल्लम यांच्यासह राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष, भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, नॅशनल पिपल्स पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

श्रीमती कळसकर म्हणाल्या, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या सूचनेप्रमाणे एसआयआर कार्यक्रमाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती देण्यासाठी प्रत्येक बुधवारी राजकीय पक्षांसोबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत २९ जूनपर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) प्रशिक्षण व गणना अर्ज छपाई करण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. राजकीय पक्षांनाही या प्रकियेबाबत सुरुवातीपासूनच विस्तृत माहिती देण्याकरिता लवकरच जिल्ह्यात प्रशिक्षण सत्राचे आयोजन केले जाणार आहे. या प्रशिक्षण सत्राच्या माध्यमातून विविध राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींना एसआयआर प्रकियेबाबत माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी लवकरात लवकर बीएलएची नेमणूक करावी जेणेकरुन बीएलओ आणि बीएलए संयुक्तरित्या बैठक घेवून ही संपूर्ण प्रक्रिया समजून घेणार आहे.

एसआयआरच्या अनुषंगाने सुनावणी घेण्याकरिता जिल्ह्यात २१ मतदार नोंदणी अधिकारी आणि ५४४ सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. राजकीय पक्षांनी 'ईसीआय नेट' (एउखछएढ) ॲप्लिकेशन डाऊनलोड करुन घ्यावे. विविध माध्यमांद्वारे एसआयआरबाबत जनजागृती करण्यात येईल, निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने राबविली जाईल तसेच कोणत्याही पात्र मतदाराचे नाव वगळले जाणार नाही, अशी ग्वाही श्रीमती कळसकर यांनी यावेळी दिली.

यावेळी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी विधानसभा मतदारसंघ निहाय अनमॅपिग मतदार यादीची मागणी केली असता ती लवकरच उपलब्ध करुन देण्यात येईल, असे श्रीमती कळसकर यांनी सांगितले.

## विस्कळीत पाणी व्यवस्थापनावर नगरसेविका संपदा चौधर आक्रमक
## ''कुणी पाणी देता का पाणी?'' म्हणत सभागृहात व्यक्त केली नागरिकांची व्यथा..!








**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** प्रभागातील विस्कळीत पाणी व्यवस्थापनाचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आणत नगरसेविका संपदा सुमित चौधर यांनी नगरपरिषदेच्या सभेत प्रशासनाला धारेवर धरले. नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा मिळत नसल्याने निर्माण झालेल्या परिस्थितीवर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. सभेमध्ये बोलताना चौधर यांनी अनेक वेळा रुई गावातील पाठपुरावा करूनही पाणी समस्येवर ठोस तोडगा निघालेला नसल्याची खंत व्यक्त केली. नटसम्राटमधील प्रसिद्ध संवादाचा संदर्भ देत त्यांनी, ''कुणी घर देता का घर...? एका म्हाताऱ्याला... एका नटसम्राटाला...'' या संवादाप्रमाणे आज आपल्या गावाची अवस्था झाली असून, नागरिकांना ''कुणी पाणी देता का पाणी...? देता का रे... कुणी पाणी देता का पाणी...?'' असे विचारण्याची वेळ आल्याची भावना व्यक्त केली. यावेळी त्यांनी प्रभागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येकडे लक्ष वेधत, वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून नियमित पाणीपुरवठा करण्याची मागणी केली. त्यांच्या या मुद्द्यावर सभागृहात काही काळ सविस्तर चर्चा झाली. दरम्यान, बारामती शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या नीरा डावा कालव्याचे आवर्तन सध्या बंद असल्याने शहरासाठी आवश्यक प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर बारामती नगरपरिषदेने मंगळवार (ता. २३) पासून दोन दिवसाआड पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना पाणी वापराबाबत काटकसरीचे धोरण अवलंबण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. पाणीटंचाईमुळे नागरिकांमध्ये वाढत असलेली अस्वस्थता लक्षात घेता, नगरसेविका संपदा चौधर यांनी प्रशासनाने तातडीने प्रभावी नियोजन करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या या गंभीर प्रश्नावर प्रशासनाने त्वरित निर्णय घेऊन दिलासा द्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी सासवड नगरपालिका कार्यरत राहणार - आनंदी जगताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** सासवड शहर परिसरातील एकल महिलांसाठी असणाऱ्या शासकीय योजना, संजय गांधी निराधार योजना, स्वयंरोजगार, बचतगट आदींच्या माध्यमातून त्यांच्या सक्षमीकरणासाठी सासवड नगर पालिका विशेष कार्यक्रम राबवत राहील असा विचार सासवड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांनी व्यक्त केला आहे. २३ जुन जागतिक एकल महिला दिन व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दीजयंती महोत्सव निमित्ताने आयोजित एकल महिलांच्या मार्गदर्शन मेळाव्यात जगताप बोलत होत्या.सासवड नगर पालिका महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात झालेल्या या कार्यक्रमांस १७५ हुन अधिक महिला उपस्थित होत्या. सदरच्या कार्यक्रमात महिला बाल विकास संरक्षण अधिकारी अच्युत शेवाळे, संजय गांधी योजनेचे अक्षय शिर्के, ग्रामीण रुग्णालयाच्या आरोग्य मित्र शुभदा जगताप व सेवानिवृत्त प्राचार्य नारायण टाक यांनी उपस्थिती दाखवून महिलांना मार्गदर्शन केले. टाक सर यांनी यावेळी महात्मा फुले यांच्या विषयी उत्तम माहिती सांगितली. पालिकेच्या प्रकल्प अधिकारी जस्मिन मधाळे यांनी सूत्रसंचालन केले तर महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती प्रियांका साकेत जगताप यांनी आभार मानले समितीच्या उपसभापती लीना वढणे व पालिका लिपिक प्राजक्ता राजगुरू यांनी सर्वांचे स्वागत केले कार्यक्रमास नगरसेविका अर्चना जगताप, शीतल भोंडे माजी नगराध्यक्षा मीना वढणे, माजी नगरसेविका माया जगताप, वसुधा आनंदे, सारिका हिवरकर यांसह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## सिंहगड एपिक ट्रेल मॅरेथॉन शनिवारी ४ देशांतील १२०० धावपटूंचा सहभाग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** वेस्टर्न घाट्स रनिंग फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेली आंतरराष्ट्रीय दर्जाची 'सिंहगड एपिक ट्रेल मॅरेथॉन २०२६' स्पर्धा येत्या शनिवारी (२७ जून) सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या आतकरवाडी येथे पार पडणार आहे. जगभरातील ४ देश, भारतातील ३५ राज्ये आणि ६५ शहरांमधील सुमारे १२०० धावपटूंनी स्पर्धेसाठी नोंदणी केली आहे.




स्वराज्याच्या ऐतिहासिक वैभवाचे प्रतीक असलेल्या सिंहगड किल्ल्याच्या परिसरातील विविध पाच मार्गांवर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ११ किलोमीटर, २१ किलोमीटर, ३० किलोमीटर आणि ४२ किलोमीटर अशा विविध गटांमध्ये धावपटू सहभाग घेणार आहेत. डोंगर-दऱ्या, चिखलमय वाटा, कडे-कपाऱ्या आणि सिंहगडाच्या नैसर्गिक परिसरातून धावण्याचा रोमांचकारी अनुभव स्पर्धकांना या मॅरेथॉनमधून मिळणार आहे.

पर्यावरण संरक्षण, गड-किल्ल्यांचे संवर्धन, पुरातन वास्तूंचे जतन आणि नियमित व्यायामाचा संदेश या उपक्रमातून दिला जात असल्याची माहिती वेस्टर्न घाट्स रनिंग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दिग्विजय जेधे यांनी दिली. सिंहगड एपिक ट्रेल ही स्पर्धा इंटरनॅशनल ट्रेल रनिंग असोसिएशनशी संलग्न असून दरवर्षी जून महिन्याच्या अखेरच्या शनिवारी आयोजित केली जाते. ही स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या शूर मावळ्यांना समर्पित असल्याचेही त्यांनी सांगितले.

स्पर्धेचे आयोजन दिग्विजय जेधे यांच्यासह अनिल पवार, महेश मालुसरे, मंदार मते, ॲड. राजेश सातपुते, मारुती गोळे, अमर धुमाळ आणि फाउंडेशनच्या सुमारे ४०० स्वयंसेवकांनी केले आहे.

## 'सावित्रीबाई जोतीराव फुले' मालिकेत झळकणार शिरूरची अनघा शिंदे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणासाठी पेटवलेल्या ज्ञानदीपाचा उजेड आजही नव्या पिढीला प्रेरणा देत आहे. या महान कार्याची गाथा सांगणाऱ्या 'सावित्रीबाई जोतीराव फुले' या मालिकेत शिरूरच्या अवघ्या नऊ वर्षांच्या अनघा अश्विनी प्रसाद शिंदे हिची निवड झाल्याने शिरूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

'जगदंब क्रिएशन' निर्मित आणि 'मराठी वारसा' या यूट्यूब वाहिनीवर प्रसारित होत असलेल्या या मालिकेत अनघा सावित्रीबाईंनी सुरू केलेल्या भारतातील पहिल्या मुलींच्या शाळेतील विद्यार्थिनी माधवी थत्ते हिची भूमिका साकारत आहे. शिक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या त्या काळातील मुलींचे आयुष्य आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणादायी कथा या मालिकेतून उलगडणार आहे.

शिरूर येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता चौथीत शिक्षण घेणाऱ्या अनघाने कोणतेही औपचारिक अभिनय प्रशिक्षण न घेता आपल्या नैसर्गिक अभिनयाच्या बळावर ही संधी मिळवली आहे. या भूमिकेसाठी राज्यभरातील सुमारे साडेतीन हजार मुलींनी सहभाग नोंदवला होता. कठीण स्पर्धेतून निवड होऊन अनघाने आपली वेगळी छाप पाडली.



खासदार आणि अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांनी समाजमाध्यमांद्वारे निवड झालेल्या सहा विद्यार्थिनींची नावे जाहीर केली असून त्यामध्ये अनघाचा समावेश आहे.

## जिल्हा परिषद पशुपालकांच्या पाठीशी ; वढू बुद्रुक येथे 'डॉक्टर आपल्या गावी' उपक्रमाचा शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** ग्रामीण भागातील पशुपालकांना गावातच दर्जेदार व तात्काळ पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद पुणे व पशुसंवर्धन विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'डॉक्टर आपल्या गावी' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ बुधवारी वढू बुद्रुक (ता. शिरूर) येथे उत्साहात करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत पुणे जिल्ह्यातील प्रत्येक पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात दर बुधवारी पशु सर्वचिकित्सा शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. यावेळी बोलताना जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी जिल्हा परिषद पशुपालकांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचे सांगत पशुपालकांना मोफत चारा, लसीकरण तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जात असल्याचे नमूद केले. ग्रामीण भागातील पशुपालकांना पशुवैद्यकीय उपचारांसाठी दूरवर जावे लागू नये



वढू बुद्रुक येथे 'डॉक्टर आपल्या गावी' उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी वीरधवल जगदाळे, विवेक वळसे-पाटील, अमोल नलावडे, डॉ. राजेश वासनिक, प्रफुल्ल शिवले, वृषाली वाळके, रामभाऊ सासवडे, कोमल भिरंगे, वंदना पवार, सुचिता थिटे, कृष्णा आरगडे व अन्य मान्यवर.

तसेच पशुधनाच्या आरोग्याची वेळेवर काळजी घेता यावी, या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे सभापती अमोल नलावडे यांनी जिल्ह्यातील सर्व पशुपालकांना या शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन करत 'डॉक्टर आपल्या गावी' हा उपक्रम पशुधनाचे आरोग्य, उत्पादनक्षमता आणि आर्थिक मूल्य वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगितले. या शिबिरांमधून पशुधन आरोग्य तपासणी, विविध आजारांवरील उपचार, गर्भतपासणी, वंध्यत्व तपासणी, रोगप्रतिबंधक लसीकरण, गोचीड व गोमाशा निर्मूलन तसेच पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांची माहिती व लाभ उपलब्ध करून दिला जाणार आहे. जिल्ह्यातील २७० ठिकाणी या योजनेची सुरुवात करण्यात आली असून पशुवैद्यकीय अधिकारी गावागावांत जाऊन सेवा देणार आहेत. उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, उपाध्यक्ष विवेक वळसे-पाटील, कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे सभापती अमोल नलावडे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. राजेश वासनिक, जिल्हा परिषद सदस्य प्रफुल्ल शिवले, वृषाली वाळके, शिरूर पंचायत समितीचे उपसभापती रामभाऊ सासवडे, पंचायत समिती सदस्या कोमल भिरंगे, वंदना पवार, सुचिता थिटे, ग्रामपंचायत प्रशासक कृष्णा आरगडे यांच्यासह अनेक मान्यवर, पशुवैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक आणि पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी पशुपालकांशी संवाद साधत पशुधन व्यवस्थापन, रोग नियंत्रण, आधुनिक पशुपालन तंत्रज्ञान तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे पशुपालकांचा वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च वाचणार असून पशुधनाला वेळेत उपचार मिळाल्याने दूध उत्पादन, प्रजनन क्षमता आणि एकूणच उत्पादनक्षमतेत वाढ होण्यास मदत होणार आहे. तसेच पशुधनामध्ये उद्भवणाऱ्या संसर्गजन्य रोगांवर नियंत्रण मिळविण्यासही या शिबिरांचा मोठा फायदा होणार आहे.

## पहिल्याच पावसात आळंदीच्या पीएमपीएमएल बसस्थानकाची दाणादाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर आळंदी आणि परिसरात वरुणराजाने दमदार हजेरी लावत उकाड्यापासून दिलासा दिला. पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असले, तरी या पहिल्याच पावसाने आळंदीतील नव्या पीएमपीएमएल बसस्थानकाच्या व्यवस्थेचे वास्तव समोर आणले आहे. बसस्थानक परिसरात सर्वत्र चिखल आणि साचलेल्या पाण्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.



गेल्या तीन महिन्यांपासून आळंदी येथील देहू फाटा वाय जंक्शन परिसरातील एसटी महामंडळाच्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात नवीन बसस्थानक सुरू करण्यात आले आहे. सध्या या ठिकाणावरून पुण्याकडे जाणाऱ्या पीएमपीएमएलच्या बससेवा सुरू आहेत. मात्र, या ठिकाणी प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.

प्रवाशांना थांबण्यासाठी शेड नाही, बसण्याची व्यवस्था नाही, पावसापासून संरक्षणाची सुविधा नाही तसेच प्रकाश व्यवस्थाही अपुरी असल्याने नागरिकांची आधीपासूनच गैरसोय होत होती. त्यातच पहिल्याच पावसाने संपूर्ण परिसर चिखलमय झाल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. बसमध्ये चढताना आणि उतरताना प्रवाशांना साचलेल्या पाण्यातून मार्ग काढावा लागत असून ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना याचा अधिक फटका बसत आहे. काही ठिकाणी पाणी साचल्याने सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळ्याला आता प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने आगामी काळात ही समस्या अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पीएमपीएमएल प्रशासनाने तातडीने या ठिकाणी निवारा शेड उभारावे, परिसरात खडी टाकून चिखलमुक्त व्यवस्था करावी तसेच प्रवाशांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी प्रवासी आणि नागरिकांकडून होत आहे. पावसामुळे दिलासा मिळाला; मात्र बसस्थानकातील गैरसोयींमुळे प्रवास अधिकच त्रासदायक ठरत आहे, अशी प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## शिरूर नगरपरिषदेच्या वतीने एकल महिला दिनाचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** एकल महिलांचे दुःख, समस्या आणि सामाजिक-आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी समाज व सरकारने संवेदनशीलपणे पुढाकार घेत त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा राज्याच्या एकल महिला धोरण निर्धारण समितीचे सदस्य हेरंब कुलकर्णी यांनी केले.शिरूर नगरपरिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने जुन्या नगरपरिषद कार्यालयात 'एकल महिला दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजित पाचर्णे, मुख्याधिकारी प्रीतम पाटील, उपनगराध्यक्ष मितेश गादिया, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती आयेशा सय्यद, उपसभापती स्वप्नाली जामदार, पाणीपुरवठा समितीच्या सभापती डॉ. सुनीता पोटे, लोकशाही क्रांती आघाडीचे अध्यक्ष रवींद्र धनक, सामाजिक कार्यकर्त्या उषा वाखारे, वुमन्स फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रिया बिरादार प्रत्युष कंपनीचे राहुल बिरादार, राजेश पाटील, महिला व बालकल्याण विभागाच्या शितल काळे , स्वच्छता निरीक्षक दत्तात्रेय बर्गे तसेच नगरसेविका व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. हेरंब कुलकर्णी म्हणाले की, शिरूर नगरपरिषदेने एकल महिलांचे सर्वेक्षण करून त्यांचे प्रश्न समजून घेण्याचा केलेला प्रयत्न कौतुकास्पद आहे. एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी सर्वांनी पुढाकार घेणे आवश्यक असून त्यांच्या समस्या व गरजांची स्वतंत्र यादी तयार केली पाहिजे. अनेक महिलांकडे विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे नसतात. ती कागदपत्रे त्यांना सहज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था शासनाने करावी. विधवा संदर्भातील समाजातील जुन्या वाईट प्रथा-परंपरा सोडून देण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी एकल महिलांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हेच त्यांच्या पुनर्वसनाचे प्रभावी माध्यम असल्याचे नमूद केले. शिरूर नगरपरिषदेने एकल महिलांसाठी रोजगारनिर्मितीचे आदर्श मॉडेल उभे करावे तसेच वार्षिक अर्थसंकल्पातील किमान एक टक्का निधी त्यांच्या रोजगारासाठी राखून ठेवावा, अशी मागणीही त्यांनी केली. राज्यस्तरावर एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याचे काम सुरू असून बचत गटांच्या माध्यमातूनही त्यांचे सक्षमीकरण करता येईल, असे ते म्हणाले. नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी सांगितले की, एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी तसेच त्यांच्या हक्क, अधिकार आणि शासकीय योजनांची माहिती पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

द•ख•ल

## श्री आनंद विद्यालयात जागतिक योगदिवस



**शिराळ चिचोंडी :** निरोगी जीवनासाठी योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर रुजवण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. योगासनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे प्राणायामसूर्यनमस्कार भुजंगासनआणि इतर योगासनाची प्रात्यक्षिकेसाजरा केली योगामुळे केवल शारीरिकनव्हे तर मानसिक आणि बौद्धिक विकास होतो हे यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पटवून दिले बदलत्या जीवनशैलीत योगाचे महत्त्व असल्याने यावेळी अधोरेखित करण्यात आले केवळ प्रात्यक्षिकच नाही तर विद्यार्थ्यांना मध्ये योगाबदलअधिक सखोल जाणीव निर्माण व्हावी यासाठी इ ५ वी ते १० वीच्याविद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निरोगी जीवनाची गुरुकिल्ली योगशालेय जीवनातयोगाचे महत्त्व आरोग्यासाठी महत्त्व या दोन विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार निबंधाच्या माध्यमातून मांडले विद्यार्थ्यांनी अतिशय समर्पक आणि अभ्यासपूर्ण निबंध लेखन करून या स्पर्धेत उत्कृष्ट सहभाग नोंदवला कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यालयाचे प्राचार्य शिंदे सर तसेच इतर शिक्षक उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल शाळेच्या वतीने शान व पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणिविद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेवगाव-कोल्हापूर बससेवा सुरू; प्रवाशांची दीर्घकालीन मागणी अखेर पूर्ण




**अमरापूर :** शेवगाव आगारातून शेवगाव-कोल्हापूर ही नवीन एसटी बससेवा सोमवारपासून सुरू करण्यात आली असून, या सेवेमुळे कोल्हापूरसह दौंड, बारामती, फलटण, सातारा व कराड या शहरांमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांची अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण झाली आहे. सुमारे ४२० किलोमीटर अंतराच्या या मार्गासाठी पूर्ण तिकीट दर ६७५ रुपये, तर अर्धे तिकीट ३४५ रुपये निश्चित करण्यात आले आहे. या बससेवेवर राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व नियमित प्रवासी सवलती लागू राहणार असल्याने विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक आणि इतर सवलतधारक प्रवाशांनाही या सेवेचा लाभ मिळणार आहे. प्रवासी राजा दिनानिमित्त प्रवासी मित्र पी. बी. शिंदे यांनी शेवगाव-कोल्हापूर बससेवा सुरू करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत नाशिक विभागाचे प्रादेशिक व्यवस्थापक विजय गिते यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांनी शेवगाव आगारास ही बससेवा सुरू करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार आगार व्यवस्थापक अमोल कोतकर यांच्या पुढाकारातून ही सेवा प्रत्यक्षात सुरू करण्यात आली. शेवगाव आगारातून प्रवाशांच्या सोयीसाठी विविध नवीन बससेवा उपलब्ध करून देण्याचे काम सातत्याने सुरू असून, कोल्हापूर बससेवा सुरू झाल्याने प्रवाशांनी समाधान व्यक्त करत आगार व्यवस्थापक अमोल कोतकर यांचे आभार मानले. बससेवेच्या शुभारंभप्रसंगी आगार व्यवस्थापक अमोल कोतकर, पी. बी. शिंदे, विजयकुमार बलदवा, किशोर कुसळकर, सचिन राजहंस, राजेंद्र घुगे, संदीप देवढे, पठाण अजिज, वाहक प्रदीप गरोटे, अविनाश वावरे, सुरेश काशीद यांच्यासह प्रवासी उपस्थित होते.

## शेवगावात मावा विक्री जोरात पोलिसांचे मात्र दुर्लक्ष

**शेवगाव :** शेवगाव येथे मावा विक्री जोरात सुरू असून स्थानिक पोलिसांचे मात्र याकडे दुर्लक्ष या मावा विक्री विरोधात कारवाई कोण करणार असा सर्वसामान्य प्रश्न विचारत आहेत. सुगंधी सुपारी विक्रीस प्रतिबंध असतानाही त्यापासून मावा बनवून चौका चौकात वीस रुपये ते ५० रुपयांपर्यंत हा मावा शेवगाव शहरात सर्रास विकला जात आहेत. एकीकडे नशा मुक्त महाराष्ट्र अशा घोषणा करायच्या आणि मावा सारख्या मनुष्याच्या आरोग्याला हानिकारक असणाऱ्या घटकाला उत्तेजन द्यायचे हे चित्र शेवगाव शहरात बघायला मिळत आहे. या मावा विक्रीतून कोट्यावधी रुपयाची उलाढाल होत असून पोलीस या माव्याच्या विरोधात कोणतीही कारवाई करताना सध्या तरी दिसत नाही. अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार सुगंधी सुपारी ला बंदी असतानाही शेवगाव शहरात मात्र बिनधास्त खुलेआम मावा विकला जात आहे. मावा खाणाऱ्यामध्ये तरुण, म्हातारे तसेच महिलाही व्यसनाधीन झालेल्या दिसत आहे त्यातून अनेक जणांना कॅन्सर तोंडाचे आजार आदी रोगांचा विळखा सर्वसामान्य जनतेला बसत आहे. मात्र पोलिसांच्या अर्थपूर्ण संबंधामुळे मावा विक्रेत्यांवर कारवाई सहसा होत नाही ही सत्य परिस्थिती आहे. अन्न भेसळ प्रतिबंधक विभागाच्या आयुक्त पदी तुकाराम मुंढे नियुक्त झाल्यानंतर मावा विक्री संपूर्णपणे बंद होईल असे वाटले होते मात्र स्थानिक अधिकाऱ्यांनी तुकाराम मुंडे यांच्या आदेशाला हरताळ फासल्याचे दिसत आहे. शेवगाव शहरातून मावा विक्री पूर्णपणे बंद व्हावी हीच सर्वसामान्य जनतेची इच्छा असून तुकाराम मुंडे यांनी लक्ष घालून मावा विक्री करणाऱ्या विरोधात कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## शिवबा संघटनेच्यावतीने दत्तक मुलांना शालेय साहित्य वाटप



**निघोज :** शिवबा संघटनेचे युवा सहकारी स्व. सचिन बोरगे यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सामाजिक बांधिलकी जपत शिवबा संघटनेने स्वीकारली आहे. या उपक्रमांतर्गत त्यांच्या मुलांचा शैक्षणिक खर्च संघटनेच्या वतीने उचलण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून शिवबा संघटना कार्यालयात शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, दप्तर तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये आणि त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या कार्यक्रमास शिवबा संघटना अध्यक्ष अनिल शेटे, शिरूर तालुका अध्यक्ष सोमनाथ भाकरे, आपला गणपती मंडळाचे अध्यक्ष रवीशेठ रणसिंग, मच्छिंद्र लामखडे, दत्तात्रय लंके, संतोष देशमुख, अविनाश लामखडे, स्वप्निल वरखडे, योगेश भाकरे, बाबाजी कळसकर, अल्पसंख्याक समाजाचे नेते सतीश साळवे तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाथर्डी बसस्थानकाला डबक्याचे स्वरूप!

अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी :** येथील जुन्या बसस्थानकाचे काही दिवसांपूर्वी झालेले पुनर्बांधणीचे काम सदोष व निकृष्ट झाल्याने अल्पशा पावसातही आवाराला गाव तळ्याचे रूप आले आहे. आवारात साचलेले पाणी जाण्यासाठी कोठूनही जागा नाही. एसटी महामंडळाचे अधिकारी निव्वळ वेळ काढू पणाचे धोरण स्वीकारत असून प्रवाशांना कुणीही वाली उरले नाही.

लाखो रुपये खर्चून काही दिवसांपूर्वी जुन्या जागेत शेड सारखे बस स्टॅन्ड बांधले. अभियांत्रिकी शास्त्राच्या कोणत्याही निकषात न बसणारे स्थानक परिवहन महामंडळाच्या बांधकाम विभागाने ताब्यात कसे घेतले असा गूढ प्रश्न प्रवाशांना पडला आहे. सदोष चुकीच्या व सर्व बाजूंनी अतिक्रमणांनी वेढलेल्या बसस्थानकामुळे बाजारपेठेचेही मोठे नुकसान झाले आहे. या गंभीर प्रश्नाकडे बघायला नेते अथवा पुढार्यांना वेळ नाही. शेड ची उंची आवश्यकतेपेक्षा जास्त तर फलाटांची उंची सर्वसामान्य पातळीपेक्षा कमी झाल्याने ऊन वारा व पावसापासून प्रवाशांचे संरक्षण होत नाही.

फक्त थेट डोक्यावर ऊन येत नाही एवढ्याच काय त्या शेडचा उपयोग असून चुकीच्या पद्धतीने नवीन बस स्थानकावरून येणारी गाडी या बसस्थानकामध्ये प्रवेश करताना विरुद्ध बाजूने येणारा प्रवासी अथवा दुचाकी चालक दिसतही नाही. मोघमपंचे चढावर गाडी चढवत चालक कसेतरी प्लॅटफॉर्म गाठतो. बांधकाम चालू असतानाच राजकीय हस्तक्षेप झाल्याने मूळ आराखडा सुद्धा ऐनवेळी बदलला जाऊन अतिक्रमणातील व्यावसायिकांच्या सामूहिक दबावा पुढे स्थानिक अधिकारी दबले जाऊन स्वच्छतागृहाची बांधणी तीन वर्षातही पूर्ण झालेली नाही.

दोन दिवसांपूर्वी सुमारे अर्धा तास शहरात पाऊस पडला. नगर रस्त्या कडील नाईक चौकापासून व कोरडगाव रस्त्यावरील उर्दू शाळेच्या समोरील बाजूकडील पाणी जुन्या बस स्थानकाच्या आवारात येऊन साचते. तेथे त्या पाण्याला जायला कुठेही जागा नाही अवैध प्रवासी वाहतूक करणारे वाहने, खाजगी गाड्या व बसेस या पाण्यातून जाऊन बेसावध पादचाऱ्यांच्या अंगावर पाणी उडते. लांबून पाणी बघितले तर गाडी आल्यानंतर बस स्थानकात कारंजे असल्याचा भास प्रवाशांना होतो. स्वच्छतागृहाची सोय नसल्याने सर्व आवारामध्ये मोकळ्या जागेचा स्वच्छतागृहासारखा होणारा वापर, भटक्या जनावरांचे मलमूत्र या सर्वांची दुर्गंधी पसरून प्रसन्न चित्ताने प्रवासासाठी घरून निघालेला प्रवासी अगदी कासावीस मनाने गाडीची वाट पाहत येथे थांबतो.

गाडीला क्वचितच गावांच्या नावाच्या पाट्या वाचता येतील अशा पद्धतीने असतात. कोणती गाडी आली की प्रवासी त्यामागे धावतात. अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने थेट प्लॅटफॉर्मला गाड्या आडव्या लावून प्रवाशांना घेऊन जातात. बस स्थानकाची उत्तर व पश्चिम बाजू म्हणजे उकिरड्यासारखी झाली आहे. तालुक्याच्या ग्रामीण भागात जाणाऱ्या खाजगी गाड्या सुद्धा दुसऱ्या गेटवर उभ्या असतात. गावात भटकंती करणारे आपली वाहने बस स्थानकाच्या आवारात पार्किंग करून निघून जातात. तिसरे गेट राष्ट्रीय महामार्गाच्या दुर्लक्षामुळे धोकादायक बनले आहे. मात्र पाणी जाण्यासाठी कोठूनही जागा नाही. डांबरीकरण अथवा कॉंक्रिटीकरणाचा फार्स यापूर्वी झाला होता. आठ दिवसांमध्येच सर्व परिस्थिती पुन्हा जैसे थे झाली. परिसरातील काही व्यावसायिक केरकचरा, टाकाऊ खाद्यपदार्थ त्यांच्या आवाजातील शेवगाव रस्त्याच्या बाजू च्या गटारामध्ये टाकतात. तेथे एवढा कचरा साचला आहे की जवळून जाणाऱ्याला सुद्धा जीव घेण्यास दुर्गंधीचा प्रचंड त्रास होतो.

पावसाळ्याला अजून तर प्रारंभ झाला आहे. खरा पावसाळा पुढे आहे. त्या दरम्यान नवरात्र, गौरी गणपतीचे सण येतात. या कालावधी मध्ये प्रवाशांची गर्दी आणखी वाढते. मागील पावसाळ्यातही याच समस्येचा त्रास दररोज व्हायचा. महामंडळाने कसलीही कार्यवाही केली नाही. निसर्गाला प्रवाशाची दया आली. पाऊस थांबल्यावर आवार वाळले. त्यानंतर प्रवाशांना पूर्ण क्षमतेने आवारा चा वापर करता आला.

साठलेले पाणी निचरा होण्याची व्यवस्था महामंडळाने तातडीने करावी. राष्ट्रीय महामार्गा विभागाने प्रवेशद्वारा पुढील फुटलेल्या गटारीची दुरुस्ती करून द्यावी.

एसटीच्या अधिकाऱ्यांनी आवारातील अतिक्रमणे हटवून प्लॅटफॉर्मची उभारणी अथवा स्वच्छतागृह करावे. नगर रस्त्याकडील प्रवेशद्वारा पुढील धोकादायक पार्किंग व रस्त्यापर्यंत आलेल्या टपऱ्यांमुळे वाहतुकीसाठी रस्ता कमी राहतो. एसटीला वळण घेण्यासाठी सुद्धा लवकर जागा मिळत नाही. त्याच जागेवर प्रवासी वाहतूक करणारी वाहने, पार्किंग केलेली असतात. अशा पद्धतीने जुने बस स्थानक म्हणजे निव्वळ बुजगावणे ठरून शहरापासून दूर अंतरावर असलेल्या मध्यवर्ती बस स्थानका वर जाण्यासाठी जीव मुठीत धरून तीव्र वाहतुकीतून जावे लागते. शहरात प्रथम येणाऱ्या प्रवाशांना नागरी समस्यांना तोंड दे ण्याची सुरुवात बस स्थानकापासूनच होते यासारखी दुर्दैवाची गोष्ट नाही.

## सर्वांगीण विकासासाठी योग महत्त्वाचा: प्राचार्य दसपुते

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये बारावा आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य श्री .संपतराव दसपुते यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये वैदिक कालखंडापासून योगाला अनन्यसाधारण असं महत्त्व आहे. योगमुनींनी आपलं आरोग्य निरोगी राहण्यासाठी योगाला महत्त्व दिलेले आहे आणि तेव्हापासून भारत देशामध्ये योग व योगाचे महत्त्व सर्वच योगिनी सांगितलेले आहे. योग दिनाला २०१४ पासून सुरुवात झाली. आणि आजच्या दिवशी योग दिन घेण्याचे कारण म्हणजेच २१ जून हा उत्तर गोलार्धामधील सर्वात मोठा दिवस आहे आणि सूर्याच दक्षिणायन सुरू होते. असे भौगोलिक महत्त्व सरांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सांगितले. त्याचबरोबर आपला सर्वांगीण विकास जर घडवून आणायचा असेल तर आपण दैनंदिन नियमितपणे योगासने प्राणायाम केली पाहिजे असं प्रतिपादन यावेळी सरांनी केले.

## चालक मालकांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करा : दारकुंडे



**नगर तालुका :** राज्यातील बस, मालवाहतूक विभागाकडून ट्रक, रिक्षा तसेच इतर वाहनांवर परिवहन आकारण्यात येणारे दंड इतर राज्यांच्या तुलनेत अधिक असल्याने वाहन चालक व मालकांमध्ये तीव्र नाराजी आहे. इतर राज्यांतील दंड आकारणी प्रमाणे राज्यातही तोच नियम लागू करावा तसेच वाहन चालक-मालकांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करावे अशी मागणी अहिल्यानगर लक्झरी बस असोसिएशनचे अध्यक्ष हनुमंत दारकुंडे यांनी केली आहे. दारकुंडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मोटार वाहन कायद्यांतर्गत राज्यात बस, ट्रक व इतर व्यावसायिक वाहनांवर इतर राज्यांच्या तुलनेने जास्त दंड आकारला जातो. तपासणीदरम्यान काही ठिकाणी वाहन चालक व मालकांना आरेरावीची वागणूक दिली जाते. बांधकाम कामगारांप्रमाणे वाहन चालकांनाही सामाजिक सुरक्षा व शासकीय सवलती मिळाव्यात अशी मागणी करताना दारकुंडे यांनी चालकांसाठी जीवन व अपंगत्व विमा, नियमित आरोग्य तपासणी, कर्तव्यावर असताना झालेल्या दुखापतीसाठी आर्थिक मदत, चालकांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती, कौशल्यवृद्धी प्रशिक्षण, ज्येष्ठ चालकांसाठी निवृत्ती सन्मान योजना तसेच घर व वाहन कर्जावरील व्याज सवलत यांसारख्या योजना सुरू करण्याची मागणी केली आहे.

## शिंदे महाविद्यालयाची सीईटीच्या निकालाची परंपरा कायम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** राज्यात सीईटी,पीसीएम व पीसीबी ग्रुप या परीक्षेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करून महाविद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम राखली. शैक्षणिक वर्ष २०२५ २६ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या ध्येय धोरणानुसार व कर्मवीर करिअर अकॅडमी अंतर्गत महाविद्यालयात नियमितपणे इयत्ता अकरावी बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सीईटी, नीट, जेईई या परीक्षांच्या तासिका सुरू आहेत. या तासिकांमध्ये फिजिक्स केमिस्ट्री मॅथ्स आणि बायोलॉजी या विषयाचे नियमित अध्यापन केले जाते. कर्मवीर करिअर अकॅडमी अंतर्गत दर शनिवारी चाचणी परीक्षा टेस्ट सिरीज घेतले जातात. तसेच संपूर्ण अभ्यासक्रमावर मॉक टेस्ट घेऊन त्याचे पर्सेंटाईज प्रमाणे निकाल तयार करण्यात येतात. यामुळे विद्यार्थी अभ्यासाच्या तयारीमध्ये कुठे आहे? हे समजते. त्याचा विद्यार्थ्यांना उर्वरित तयारीसाठी उपयोग होतो.

अध्यापनातील आधुनिक इंटरऍक्टिव्ह डिजिटल बोर्डचा वापर व विविध संगणकीकृत सॉफ्टवेअरचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास समजावून घेणे सोपे झाले. रयत गुरुकुल पॅटर्नमुळे महाविद्यालयाचा निकाल उत्कृष्ट लागलेला आहे. याचा विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी फायदा होणार आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी दिली.

## रवळगावातील शेतात रानडुकरांचा हैदोस..

### डाळिंब बागेचे लाखो रुपयांचे नुकसान ; भरपाईची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**मिरजगाव :** रानडुकरांच्या वाढत्या उपद्रवाने कर्जत तालुक्यातील रवळगाव येथील शेतकऱ्याचे डाळिंब बागेचे नुकसान झाले असून यामध्ये एक ते दीड टन डाळींब पिकाचे नासाडी होऊन अंदाजे ६ ते ७ लाख रूपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

या झालेल्या नुकसानीचा वन विभागाने तातडीने पंचनामा करावा आणि रानडुकरांचा बंदोबस्त करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. रवळगाव ता.कर्जत येथील शेतकरी मनोहर चिमाजी रासकर यांचे चिंतामणी मंदिर शिवारात दीड एकर डाळींब बाग आहे. त्यांच्या डाळींब बागेला चांगला बहार आला आहे. मात्र, रानडुकरांनी आपला मोर्चा या डाळिंब बागेवर वळवल्याने काढणीला आलेल्या डाळींब फळांचे व झाडांचे तसेच बागेला कुंपण करण्यात आलेल्या जाळीचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. रवळगाव परिसरात रान डुकरांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान होत आहे. आधीच कांद्यासह इतर शेतीमालाला भाव नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना दुसरीकडे रान डुकरांच्यापायी होत असलेली नुकसान यामुळे शेतकरी पुरता मेटाकुटीस आला आहे.

आणि बाजारात देखील डाळिंबाला चांगला बाजार भाव राहिल्याने भरपूर पैसे येतील या आशेवर बसले असताना त्यांची पूर्तता नैराश्या झाली असून आर्थिक संकटात सापडले आहेत. या परिसरात अनेक दिवसांपासून रान डुकरांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी वर्गाला मोठ्या प्रमाणात नुकसानीचा सामना करावा लागत असून, वन विभागाने याची दखल घेऊन या रानडुकरांचा बंदोबस्त करावा व नुकसानग्रस्त बागेची पाहणी करून पंचनामा करावा व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी येथील शेतकरी वर्गाच्या वतीने करण्यात येत आहे.

## आ. पाचपुते यांच्या पाठपुराव्याला यश

### दरेकर यांच्या कुटुंबाला ४ लाखांची मदत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** घोडेगाव येथील तरुण शेतकरी अभिषेक रूपचंद दरेकर (वय २२) यांचा शेतात काम करत असताना अंगावर वीज पडून झालेल्या दुर्दैवी मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला शासनाकडून ४ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली आहे. आमदार विक्रम पाचपुते यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही मदत मंजूर होऊन संबंधित रक्कम लाभार्थींच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. घोडेगावचे माजी सरपंच रूपचंद दरेकर यांचे एकुलते एक पुत्र असलेल्या अभिषेक यांचा काही दिवसांपूर्वी शेतात ट्रॅक्टर चालवत असताना वीज कोसळून जागीच मृत्यू झाला होता. या घटनेने संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात आली होती. दरेकर कुटुंबावर ओढवलेल्या या दुःखद प्रसंगाची दखल घेत आमदार विक्रम पाचपुते यांनी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात हा विषय मांडून शासनाकडे तातडीच्या आर्थिक मदतीची मागणी केली होती.त्यांच्या पाठपुराव्यानंतर शासनाने दरेकर कुटुंबासाठी ४ लाख रुपयांची मदत मंजूर केली. याबाबतची माहिती देण्यासाठी तहसीलदार सचिन डोंगरे, नायब तहसीलदार व तलाठी यांनी दरेकर कुटुंबाची भेट घेतली.दरम्यान, परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा प्रतिभा पाचपुते यांनीही दरेकर कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तसेच बाळासाहेब महाडिक यांनीही कुटुंबीयांची भेट घेत दुःखात सहभागी होत धीर दिला. या वेदनादायी प्रसंगी पाचपुते कुटुंब व सहकारी दरेकर कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे राहिल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. अभिषेक यांच्या अकाली निधनामुळे आई-वडील आणि अविवाहित बहिणीचा आधार हरपला आहे. शासनाकडून मिळालेली आर्थिक मदत ही दुःखाची भरपाई नसली तरी संकटाच्या काळात दिलासा देणारी ठरत असल्याचे मत व्यक्त होत आहे. वीजेच्या एका तडाख्याने दरेकर कुटुंबाचा आधार हिरावला; मात्र आमदार विक्रम पाचपुते यांच्या पाठपुराव्यामुळे शासनाची मदत वेळेत मिळाली, तर प्रतिभा पाचपुते आणि बाळासाहेब महाडिक यांनी प्रत्यक्ष भेट देऊन कुटुंबाला धीर दिला, अशी भावना घोडेगाव परिसरात व्यक्त होत आहे.

# आर्द्रा नक्षत्राच्या सरी बरसल्या

### पेरणीसाठी बळीराजाची लगबग

शंशिकात पवार । राष्ट्र सह्याद्री



**नगर तालुका :** नगर तालुक्यात आर्द्रा नक्षत्राच्या प्रारंभी कमी-अधिक प्रमाणात पावसाच्या सरी बरसल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. समाधानकारक पाऊस अद्याप झालेला नसला तरी खरीप हंगामातील पेरण्यांसाठी बळीराजाची लगबग सुरू होताना दिसुन येणार आहे. तालुक्यातील सर्व बारा महसूल मंडळांमध्ये विखुरलेल्या स्वरूपात पाऊस झाला आहे. मंगळवार (दि.२३ ) व बुधवारी दिवसभर तालुक्यात पावसाची रिमझिम सुरूच होती. पावसामुळे खरीप हंगामातील पिकांबाबत शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

मृग व रोहिणी नक्षत्र जवळपास कोरडे गेल्याने खरीप हंगामाचे नियोजन विस्कळीत झाले आहे. वेळेत पाऊस न झाल्याने मुगाच्या पेरणीत मोठी घट होण्याची शक्यता कृषी क्षेत्रातून व्यक्त होत आहे. त्याऐवजी बाजरी व सोयाबीनच्या क्षेत्रात वाढ होण्याचा अंदाज आहे. खरीप हंगामात बाजरी, मुग, सोयाबीन तालुक्यातील मुख्य पिके आहेत. परंतु पावसाने उशिरा हजेरी लावल्याने मुगाच्या क्षेत्रात मोठी घट होणार आहे.

कृषी विभागाने पेरणीपूर्वी किमान १०० मिलिमीटर पाऊस होणे आवश्यक असल्याचा सल्ला दिला आहे. पुरेशा ओलाव्याशिवाय पेरणी केल्यास बियाणे उगवणीत अडचणी येण्याची तसेच दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची शक्यता असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे. मात्र पावसाच्या प्रतीक्षेत आधीच बराच काळ गेलेला असल्याने अनेक शेतकरी आता धोका पत्करून पेरणी करण्याच्या मनस्थितीत दिसत आहेत.

आर्द्रा नक्षत्रातील सरींमुळे शेतजमिनीच्या वरच्या थरात काही प्रमाणात ओलावा निर्माण झाला असला तरी भूजल पातळीत अद्याप वाढ झालेली नाही. विहिरी, बोअरवेल आणि पाणीसाठ्यांची स्थिती सुधारलेली नसल्याने ग्रामीण भागातील चिंता कायम आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही अनेक गावांमध्ये अद्याप गंभीर स्वरूपात आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवसांत पावसाच्या शक्यता वर्तवल्या असल्या तरी शेतकऱ्यांचे लक्ष आता जोरदार आणि सलग पावसाकडे लागले आहे. खरीप हंगामाचे भवितव्य पुढील आठवडाभरातील पावसावर अवलंबून राहणार असल्याचे जाणकारांचे मत आहे. आर्द्रा नक्षत्राने पावसाची नांदी दिली असली तरी शेतकऱ्यांच्या आशा अजूनही भरघोस पावसावर खिळून आहेत.

### जोरदार पावसाची प्रतीक्षा कायम ; सर्व मंडळात पावसाची हजेरी ; खरिपाच्या आशा पल्लवीत

मृग रोहिणी नक्षत्र कोरडे गेल्याने मुगाची पेरणी अत्यंत कमी प्रमाणात होईल. दोन दिवस सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण तयार झाले आहे. वापसा झाल्यावर बाजरी व मुगाची पेरणीसाठी बळीराजाची लगबग सुरू होईल. अद्यापही जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे.

**बाळासाहेब तवले**

शेतकऱ्यांनी ७५ ते १०० मिलिमीटर पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये. बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी. कमी पाण्याच्या पिकांची पेरणी फायदेशीर ठरू शकते. पेरणी करताना उच्च दर्जाच्या बियाणांची निवड करावी. काही समस्या असल्यास कृषी विभागाशी संपर्क साधावा.

**धनराज गुंड**

## श्रीगोंद्यात ७ दिवसांत ३३६ वाहनांवर कारवाई

### तब्बल पावणे सहा लाखांचा दंड वसूल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : शहरातील चोरीच्या वाहनांना आळा घालण्यासाठी आणि वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी श्रीगोंदा पोलिसांनी राबविलेल्या विशेष मोहिमेत मोठी कारवाई केली आहे. केवळ सात दिवसांत विना नंबर प्लेट आणि आवश्यक कागदपत्रांशिवाय फिरणाऱ्या ३३६ वाहनांवर कारवाई करून तब्बल ५ लाख ७४ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे काही जण चोरीची वाहने नंबर प्लेट काढून वापरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार १७ जून ते २३ जून दरम्यान श्रीगोंदा शहर आणि परिसरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत विना नंबर प्लेट फिरणारी ३३६ दुचाकी वाहने ताब्यात घेऊन त्यांची आरसी बुक, इंजिन नंबर, चेसिस नंबर आणि मालकीची पडताळणी करण्यात आली. तपासणीनंतर कागदपत्रे योग्य आढळलेल्या ३१५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करून त्यांना जागीच नंबर प्लेट बसविण्याच्या सूचना देण्यात आल्या. मात्र, २१ वाहनधारक आवश्यक कागदपत्रे सादर करू न शकल्याने त्यांची वाहने पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली आहेत. गेले सात दिवसात एकूण



६८,००० रुपये दंड गोळा करण्यात आला. वाहनांच्या पुढील व मागील बाजूस नंबर प्लेट नसल्यास संबंधित वाहनांवर कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल. असे पोलिसांनी नागरिकांना स्पष्ट सूचना दिल्या. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी तातडीने नियमांनुसार नंबर प्लेट बसवून घ्याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. ही विशेष मोहीम पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस उपनिरीक्षक सचिन लिमकर, मनोहर खिळदकर, पोलीस कॉन्स्टेबल आजिनाथ जाधव, गोरख जाधव तसेच होमगार्ड यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## शिर्डीत दोन लाखांचे निकृष्ट पेढे जप्त; तीन उत्पादन केंद्रांवर कारवाई

### अन्न व औषध प्रशासन, वैध मापन व डेअरी विभागाची संयुक्त धाड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबा प्रसादाच्या नावाखाली विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांवर अन्न व औषध प्रशासन, वैध मापन विभाग, डेअरी विकास विभाग आणि स्थानिक प्रशासनाने संयुक्त कारवाई करत सुमारे साडेसहाशे किलो वजनाचे अंदाजे दोन लाख रुपये किमतीचे पेढे जप्त करून नष्ट केले. या कारवाईमुळे शिर्डीतील मिठाई व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

साईबाबा दर्शनासाठी दररोज हजारो भाविक शिर्डीत येत असल्याने पेढे व मिठाई उत्पादन करणाऱ्या काही आस्थापनांकडून अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार विशेष तपासणी मोहीम राबवून शिर्डीतील काही मिठाई विक्री केंद्रे तसेच निमगाव



निघोज परिसरातील तीन पेढा उत्पादन कारखान्यांवर धाड टाकण्यात आली. तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणात पेढे, दूधजन्य पदार्थ व अन्य साहित्य जप्त करण्यात आले. उत्पादन तारीख, कालबाह्यता दिनांक, पॅकेजिंग मानके, वजनातील तफावत तसेच काही वजनकाटे प्रमाणित नसल्याचे आढळून आले. संबंधित साहित्याचा पंचनामा करून माल अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात आणण्यात आला.

त्यानंतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून कचरा डेपो येथे खड्डा खोदून जेसीबीच्या सहाय्याने तो नष्ट करण्यात आला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्राप्त तक्रारींची दखल घेत ही कारवाई करण्यात आली असून जप्त केलेल्या नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी केली जाणार आहे. अहवालानुसार संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात येणार आहे. दूध भेसळ प्रतिबंधक समितीचे अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार झालेल्या या कारवाईत पोलीस प्रशासन, नगरपालिका, अन्न व औषध प्रशासन, वैध मापन विभाग व डेअरी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. भाविकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांविरोधात अशा कारवाया यापुढेही सुरू राहतील, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## सार्वजनिक रस्ता नांगरणे पडले महागात...

### ट्रॅक्टर मालकाच्या सातबाऱ्यावर पावणेसात लाखांचा बोजा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे प्रवरा डाव्या कालव्यानजीकचा सार्वजनिक रस्ता ट्रॅक्टरने नांगरून सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान करणाऱ्या प्रकरणाची महसूल विभागाने अत्यंत गंभीर दखल घेतली आहेत. संगमनेरचे तहसीलदार धिरज मांजरे यांनी या प्रकरणी कडक कायदेशीर पाऊल उचलत, रस्ता नांगरण्यासाठी वापरण्यात आलेल्या ट्रॅक्टरच्या मूळ मालकाच्या सातबारा उताऱ्यावर चक्क ६ लाख ८८ हजार ५३६ रुपयांचा बोजा चढवण्याचे आदेश दिले आहेत. प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे सरकारी मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांमध्ये घबराट पसरली आहे.

**काय आहे संपूर्ण प्रकरण?**

मे महिन्याच्या सुरुवातीला (७ मे २०२६ रोजी) उंबरी बाळापूर येथील महेश उर्फ छोट्या अनिल सरोदे या व्यक्तीने संगमनेर-जोर्वे-आश्वी-कोल्हार या जिल्हा मुख्य मार्ग क्र. २१ चे काम सुरू असताना, प्रवरा डाव्या कालव्यानजीक असलेला सार्वजनिक रस्ता ट्रॅक्टरने नांगरून टाकला होता. या बेकायदेशीर कृत्यामुळे कालव्याच्या भरावाला धक्का लागून तो फुटण्याची भीती आणि मानवी जीविताला धोका निर्माण झाला होता.

या प्रकाराला स्थानिक नागरिकांनी विरोध केला असता, संबंधिताने लोकांना शिवीगाळ केली होती व नंतर सोशल मीडियावरून व्हिडिओ टाकून गावात दबाव तंत्राचा वापर करण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेच्या निषेधार्थ उंबरी बाळापूर ग्रामस्थांनी गाव बंद ठेवून आक्रमक पवित्र घेतला होता व आश्वी पोलीस ठाण्यात गुन्हा (रजि. नं. ९५/२०२६) देखील दाखल करण्यात आला होता. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करून गावाला वेठीस धरणाऱ्या प्रवृत्तींना चाप लावण्यासाठी महसूल व पोलीस विभागाने एकत्रितपणे केलेली ही कारवाई सध्या तालुक्यात मोठी चर्चेचा विषय ठरली आहे.

**चार पट दंडाची कडक कारवाई**

सार्वजनिक बांधकाम उपविभागाने केलेल्या पाहणी आणि मूल्यांकनानुसार, या कृत्यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे १,७२,१३४ रुपये इतके आर्थिक नुकसान झाले होते. या नुकसानीची वसुली करण्यासाठी तहसीलदार कार्यालयाने नियमाचा बडगा उगारला आहे. नियमानुसार मूळ नुकसानीच्या चार पट दंड आकारण्यात आला असून, ही एकूण रक्कम ६ लाख ८८ हजार ५३६ रुपये एवढी होते.

**सातबाऱ्यावर बोजा चढवण्याचे आदेश:**

हा गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेला ट्रॅक्टर (क्र. चक १७ ऊ ४१९७) हा सुभाष नानासाहेब भुसाळ (रा. उंबरी) यांच्या मालकीचा असल्याचे तपासात समोर आले. त्यामुळे तहसीलदार धिरज मांजरे यांनी उंबरी बाळापूरच्या ग्राम महसूल अधिकाऱ्यांना (तलाठी) तात्काळ आदेश देऊन, ट्रॅक्टर मालक सुभाष भुसाळ यांच्या सातबारा उताऱ्यावर या दंडाच्या रकमेचा बोजा चढवण्याचे आणि केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

## जेष्ठ नेते शरद पवारांची राहुरीला धावती भेट

### समर्थकांसह कार्यकर्त्यांची गर्दी !



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : ज्येष्ठ नेते , राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार अहिल्यानगर जिल्ह्यातील कार्यक्रम आटोपून बारामतीकडे जाताना राहुरीत काही काळ कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव थोडा वेळ थांबले. यावेळी राहुरीत असलेल्या त्यांच्या समर्थकांसह कार्यकर्त्यांनी जल्लोषात त्यांचे स्वागत केले. राष्ट्रवादी काँग्रेस निर्मितीच्या वेळी अहिल्या नगर जिल्ह्यातून माजी खासदार प्रसाद तनपुरे व तनपुरे समर्थक यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस सोबत जाण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतरच्या काळात अनेक घडामोडी घडल्या. राष्ट्रवादी काँग्रेस मधून अजित पवार यांचा गट फुटून सत्ताधारी महायुतीला जाऊन मिळाला . पुन्हा अलीकडच्या काळात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे युवा नेते माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी भाजपात प्रवेश केला व ते भाजपा प्रणित महायुतीच्या सरकारमध्ये सध्या ते विधान परिषदेचे विद्यमान आमदार झालेले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर काल ज्येष्ठ नेते शरद पवार जिल्ह्यातील कार्यक्रम आटोपून बारामती कडे जाताना राहुरी शहरातील बस स्थानक परिसरात नगर - कोपरगाव नॅशनल हायवे वर राष्ट्रवादीच्या कार्यकर्ते व समर्थकांच्या आग्रहाखातर काही काळ थांबले.

ते येताच समर्थकांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. त्यानंतर श्री पवार बारामतीकडे रवाना झाले. या सर्व घडामोडींची सध्या राहुरी शहर तालुक्यासह नगर जिल्ह्यात ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राहुरीतील क्षणिक भेटीची चर्चा राहुरी तालुक्यात होत आहे.

## इन्स्टाग्रामवरील फ्रेंचायझीच्या आमिषाला बळी

### व्यावसायिकाची साडेपाच लाखांची फसवणूक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : सोशल मीडियावरील आकर्षक जाहिरातींवर विश्वास ठेवणे किती महागात पडू शकते, याचा प्रत्यय संगमनेर येथील एका मेडिकल व्यावसायिकाला आला आहे. डिलिव्हरी लॉजिस्टिक कंपनीची फ्रेंचायझी देण्याचे आमिष दाखवत सायबर भामट्यांनी तब्बल ५ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी सायबर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संगमनेर शहरातील पावबाकी रोड परिसरात राहणारे मेडिकल व्यावसायिक महेश रामनिवास मुंदडा यांना डिलिव्हरी लॉजिस्टिक कंपनीची फ्रेंचायझी सुरू करण्याची इच्छा होती. याच दरम्यान त्यांच्या इन्स्टाग्रामवर फ्रेंचायझी संदर्भातील जाहिरात दिसली. त्यांनी संबंधित ऑनलाइन अर्ज भरून आपली माहिती दिली. यानंतर मयांक गुप्ता, परमार आणि प्रियांका या तिघांनी वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकांवरून संपर्क साधत फ्रेंचायझी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. विविध शुल्क, नोंदणी, प्रक्रिया आणि इतर कारणे सांगून त्यांनी टप्प्याटप्प्याने मुंदडा यांच्याकडून ५ लाख ५० हजार रुपये जमा करून घेतले. मात्र, पैसे भरल्यानंतरही फ्रेंचायझी मिळाली नाही. तसेच संशयास्पद ई-मेल आयडी व संपर्क पद्धतीमुळे मुंदडा यांना संशय आला.

चौकशी केल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे स्पष्ट होताच त्यांनी थेट सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे सायबर पोलिसांनी आरोपी मयांक गुप्ता, परमार आणि प्रियांका यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

**नागरिकांनी घ्यावी खबरदारी**

सायबर पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियावरील फ्रेंचायझी, नोकरी, गुंतवणूक किंवा व्यवसायाच्या आमिषांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे. कोणतीही रक्कम भरण्यापूर्वी संबंधित कंपनीची अधिकृत माहिती व कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## शेतीच्या वादातून शेतकऱ्याला मारहाण, १४ जणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील बऱ्हाणपूर येथे शेतीच्या वादातून झालेल्या हाणामारीत एक जण जखमी झाल्याची घटना घडली असून, या प्रकरणी १४ जणांविरुद्ध शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रवीणकुमार दत्तात्रय भांड (वय ३४, रा. धोत्रे बुद्रुक, ता. पारनेर) हे दि. १५ जून रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास बऱ्हाणपूर येथील गट क्रमांक १३२ मधील शेतात काम करत होते. यावेळी शेतीच्या वादातून आरोपींनी तेथे येऊन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली.फिर्यादीनुसार, जालिंदर भानुदास रासकर, अशोक भानुदास रासकर, विष्णु भानुदास रासकर, संजय भानुदास रासकर, ओंकार रासकर, कृणाल रासकर, बापू तुकाराम रासकर, किरण बापू रासकर, अक्षय विष्णु रासकर, सुनिता अशोक रासकर, शितल जालिंदर रासकर, वैशाली विष्णु रासकर आणि बाळासाहेब दामु रासकर (सर्व रा. बऱ्हाणपूर) यांनी संगनमताने गैरकायदेशीर जमाव जमवून लोखंडी रॉड, लाकडी काठ्या तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली.या मारहाणीत फिर्यादीसह त्यांच्या नातेवाईकांनाही मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच गोंधळाच्या वेळी फिर्यादीच्या गळ्यातील सुमारे दोन तोळे वजनाची सोन्याची चैन गहाळ झाल्याचेही त्यांनी पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. घटनेनंतर जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. (दि.२३) जून रोजी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल घोडके करीत आहेत.

## व्हॉल्व्हमध्ये रबरी वॉशर नसल्याने आग ;

### मुंजेवाडीत घरासह संसार जळून राख



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : गॅस सिलेंडरच्या व्हॉल्व्हमध्ये रबरी वायसर नसल्याने झालेल्या गॅस गळतीमुळे अचानक लागलेल्या आगीत मुंजेवाडी (अकलापूर, ता. संगमनेर) येथील कापसे कुटुंबाचा संपूर्ण संसार जळून खाक झाला.

गॅस एजन्सीच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचे कापसे कुटुंबीयांचे म्हणणे आहेत. संगमनेर तालुक्यातील मुंजेवाडी येथील दिनेश कैलास कापसे (व्यवसायाने चालक) हे बाहेरगावी असताना त्यांच्या वडिलांनी बोटा येथील एजंटकडून 'एचपी' कंपनीचा गॅस सिलेंडर आणला होता. दिनेश कापसे यांच्या पत्नी अनिता कापसे यांनी हा सिलेंडर जोडला आणि शेगडी पेटवण्यासाठी लाईटर मारले. मात्र, सिलेंडरला रबरी वायसर नसल्याने गॅस गळती होऊन अचानक रेगुलेटरने पेट घेतला आणि आगीचा मोठा भडका उडाला.

या भीषण आगीत कापसे कुटुंबाचे अन्नधान्य, कपडे, विद्युत उपकरणे आणि संसारोपयोगी साहित्य संपूर्णपणे जळून खाक झाले आहेत. आगीच्या तीव्रतेमुळे घराचे पत्रेही फुटले आहेत. अनिता कापसे यांची १२ वर्षांची मुलगी स्वरा ही ६ व्या इयत्तेत शिकत असून, ती घरात झोपलेली असताना ही घटना घडली. सुदैवाने ती आणि तिचा ३ वर्षांचा भाऊ वेदांग सुरक्षित आहेत. मात्र, स्वराचे सर्व शैक्षणिक साहित्य व पुस्तके या आगीत जळाली आहेत. घटनेनंतर अनिता कापसे यांनी संबंधित गॅस एजंटशी संपर्क साधला. त्यानंतर एजन्सीच्या प्रतिनिधींनी येऊन पाहणी केली असता, सिलेंडरमध्ये वायसर नसल्याचे उघड झाले.

कंपनीच्या वरिष्ठांनी नुकसान भरपाई देण्याचे तोंडी आश्वासन दिले असल्याचे संगीता कापसे यांनी सांगितले. ग्राहकांना गॅस टाकी देताना ती व्यवस्थित न तपासणाऱ्या एजन्सीवर परिसरातील नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.


जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित

**आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर**

१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर - ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६

E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com

**बालरोग मोफत तपासणी शिबीर**

शुक्रवार दि. २६-०६-२०२६ * वेळ : सकाळी १० ते २



तज्ञ डॉक्टर

डॉ. निखीलकुमार गुट्टे - नवजात शिशु व बालरोग तज्ञ

डॉ. रुपेश सिकची - पेडियाट्रीक सर्जन | डॉ. वैभवी वंजारे - बालरोग तज्ञ

- २६ बेडचे एन.आय.सी.यू. अद्ययावत रुग्णालय..
- नवजात बाळाच्या श्वासोच्छवासाच्या होणाऱ्या त्रासावर उपचार
- बालदमा ए.आर.डी.एस. (श्वसनदाह), नवजात कावीळसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा.
- अनुवंशिक आजार व जन्मजात आजारावर निदान.
- बालदमा तसेच लहान मुलांचे टु-डी इको, एक्स-रे, पॅथोलॉजी लॅब २४ तास उपलब्ध.
- आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीचे मशिन्स् उपलब्ध..
- २४ तास तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध.
- महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया केले जातील.

**सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया**

| | |
|---|---|
| सरकमसीजन (सुंता) | 7500/- |
| हायड्रोसील | 12700/- |
| ॲपेंडीक्स | 14500/- |
| जांघेचा हर्निया | 14000/- |
| बेंबीचा हर्निया | 10650/- |

* औषधाचा खर्च वेगळा लागेल.
* सोनोग्राफी,रक्त, लघवी इ. तपासण्या ५०% सवलतीच्या दरात केल्या जातील.

एम.आर.आय. रू 2500/- | रात्री 1.00 ते पहाटे 5.00 या वेळेत एम.आर.आय. केल्यास रु. 750/- ची सुट | : संपर्क : 9404297411

डिजिटल एक्सरे रू. 250/- | सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह रू. 800/- | संपर्क :9405271878

सिटीस्कॅन रू. 1250/- संपर्क :9404299911

24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक

होम ब्लड सॅम्पल कलेक्शन मो. नं. 9373807842

हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.

१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर - ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६

E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com